रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ७०
www.ramprahar.com
मंगळवार, २६ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आमदार अपात्रतेसंदर्भात पुढील सुनावणी १३ ऑक्टोबरला



**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणातील दुसरी सुनावणी सोमवारी (दि. २५) विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. या सुनावणीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ॲड. अनिलसिंह साखरे यांनी बाजू मांडली, तर ठाकरे गटाकडून ॲड. देवदत्त कामत यांनी युक्तिवाद केला. या सुनावणीत ठाकरे गटाकडून सर्व दाखल ३४ याचिका एकत्रित करून सुनावणी करा, अशी मागणी करण्यात आली, मात्र सर्व याचिकांच्या एकत्रित सुनावणीला शिंदे गटाच्या वकिलांकडून विरोध करण्यात आला. शिंदे गटाचे वकील अनिलसिंह साखरे यांनी सर्व याचिका एकत्रित नको, स्वतंत्र सुनावणी घ्या, असे म्हटले. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १३ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

### अंतरंग

धनगर आरक्षणाचे पत्र घेऊन ना. महाजन चौंडीला जाणार/२
कोकण पदवीधर मतदारसंघात होणार मतदार नोंदणी/५
वाडगावच्या कुस्ती स्पर्धेत नाथा पवार विजेता/८

# माथाडी कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासन वचनबद्ध

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माथाडी समाजातील बांधवांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी हे शासन वचनबद्ध आहे. माथाडी कामगारांचे नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रयत्नांमुळे अस्तित्वात आलेल्या माथाडी कायद्यात कोणत्याही परिस्थितीत छेडछाड केली जाणार नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २५) येथे केले.

माथाडी कामगार युनियनच्या वतीने स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ९०व्या जयंतीनिमित्त वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित माथाडी कामगार मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

या मेळाव्यास स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार सर्वश्री नरेंद्र पाटील, गणेश नाईक, शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंदा म्हात्रे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, निरंजन डावखरे, शशिकांत शिंदे, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, संघटनेचे अध्यक्ष एकनाथ जाधव, चंद्रकांत पाटील, मिलिंद भोंड, रविकांत पाटील, आनंद पाटील, बाजार समितीचे चेअरमन अशोक डक, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, माथाडी समाजाच्या व्यथा समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी माथाडी कामगार मेळाव्याचे व्यासपीठ महत्त्वाचे आहे. माथाडी कामगारांच्या प्रश्नावर शासन गंभीरपणे विचार करीत आहे. माथाडी कामगार कायद्यातील तरतुदी बदलासंबंधीच्या मागणीवरून कामगार विभागाने सुधारणा सुचविल्या होत्या, मात्र त्या वेळी माथाडी नेत्यांनी विरोध केल्यामुळे त्या सुधारणा थांबविल्या. बनावट माथाडींमुळे राज्यातील अनेक उद्योग बाहेर जात आहेत. माथाडी कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांना जेरबंद केल्यास आपल्या माथाडी कामगार बांधवांना दोन पैसे जास्तच मिळतील. त्यामुळे माथाडी चळवळीला बदनाम करणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी काळानुरूप माथाडी कामगार कायद्यात बदल होणे आवश्यक आहे. ते करताना या कायद्याचा आत्मा बदलणार नाही, असे आश्वासन देऊन उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, माथाडी कायद्याला बदनाम करणाऱ्या, त्याचा दुरुपयोग करणाऱ्या घटकांना जेरबंद करणार असून त्यासाठी या कायद्यात काळानुरूप काही बदल आवश्यक आहेत, मात्र सुधारणा करताना माथाडी नेत्यांच्या सूचनाही निश्चितच विचारात घेतल्या जातील.

नाशिकच्या माथाडी कामगारांचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे निश्चितच लवकरात लवकर मार्गी लावण्यात येईल. सिडकोच्या माध्यमातून माथाडी कामगार बांधवांसाठी घरांचा प्रश्नही येत्या काळात मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. माथाडी कामगारांचे ज्यांनी चुकीच्या मार्गाने पैसे घेतले आहेत त्यांचे पैसे कायदेशीर मार्गाने परत मिळवून देऊ. बाजार समिती विकास आराखडा लवकरच पूर्ण करून. या संदर्भात बैठक लावून तत्काळ कार्यवाही करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, आमदार नरेंद्र पाटील यांनी स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आतापर्यंत ७० हजार मराठा समाजातील नवउद्योजक तयार केले. **(पान २ वर..)**



## गव्हाण विद्यालयात कर्मवीर जयंती साजरी

# साधी राहणी व उच्च विचारसरणीने विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग भरारी घ्यावी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साधी राहणी व उच्च विचारसरणी हे कर्मवीर अण्णांचे तत्व अंगी बाणवून विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग भरारी घ्यावी, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. २५) गव्हाण येथे केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६व्या जयंतीनिमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये कर्मवीर जयंती व थोर देणगीदारांतर्फे गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

### अविश्रांत परिश्रम घ्या –संजीव धुमाळ

प्रमुख अतिथी न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजीव धुमाळ यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी उच्च स्वप्न बाळगून त्या स्वप्नांच्या ध्येयपूर्तीसाठी अविश्रांत परिश्रम घेण्याचे सूचित केले. आपण रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान असल्याचे सांगून धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्वांची व विचारांची आपण प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. अण्णांनी हयातभर घेतलेल्या अपार कष्टामुळे आज संस्थेचा प्रचंड मोठा डोलारा उभा राहू शकला असे सांगताना त्यांनी आपल्या शालेय व महाविद्यालयीन आठवणी सांगून रयत शिक्षण संस्थेच्या कमवा व शिका या योजनेतून आपण घडलो आणि जिद्द, स्वकष्ट व अपार मेहनतीने आज इथपर्यंत आलो, असे सांगितले. तुम्हीही आयुष्यात श्रमाला महत्त्व देऊन जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उत्तुंग ध्येय सिद्धीसाठी आळस झटकून व लोकांच्या नकारात्मक टीकेचा विचार न करता ध्येयाप्रती एकनिष्ठ राहावे. त्याचप्रमाणे आपले विद्यालय, आपले गाव आपली माणसं यांना कधीही विसरू नये, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले. **(पान २ वर..)**

## निवडक

### पुण्यात नोव्हेंबरमध्ये रंगणार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातर्फे घेण्यात येणारी ६६वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पुणे जिल्ह्यातील फुलगाव येथे १ ते ७ नोव्हेंबरदरम्यान होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या स्पर्धेला उपस्थित राहणार असल्याची माहिती राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस यांनी दिली.

### राज ठाकरे यांनी घेतले मुख्यमंत्र्यांच्या गणेशाचे दर्शन

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी (दि. २५) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी राज ठाकरेंच्या हस्ते गणपतीची आरतीही करण्यात आली.

## नागालँडमधील राष्ट्रवादीचे सात आमदार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत




**मुंबई : प्रतिनिधी**

नागालँडमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात आमदारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सोमवारी (दि. २५) मुंबईत पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत नागालँड येथील सात आमदारांचे स्वागत केले. नागालँड राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षही उपस्थित होते. या वेळी खासदार तटकरे म्हणाले, आम्ही नागालँडमधील राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांना विनंती करीत होतो. त्यानुसार हे सर्व आमदार आमच्यासोबत आले आहेत.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृतिदिन साधेपणाने




### आमदार महेश बालदी यांनी केले अभिवादन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रहाचा ९३वा स्मृतिदिन सोमवारी (दि. २५) साधेपणाने झाला. सत्याग्रहातील हुतात्म्यांना दरवर्षीप्रमाणे यंदाही पोलिसांकडून मानवंदना देण्यात आली. दरम्यान, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर यांनी चिरनेर येथे जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात चिरनेरच्या भूमीत २५ सप्टेंबर १९३० साली शांततेच्या मार्गाने जंगल सत्याग्रह करण्यात येत होता. त्या वेळी ब्रिटीश सरकारच्या जुलमी पोलीस यंत्रणेने सत्याग्रहींवर बेछूट गोळीबार केला. या गोळीबारात धाकू बारक्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (चिरनेर), रघुनाथ मोरेश्वर (कोप्रोली), रामा बामा कोळी (मोठी जुई), आनंदा माया पाटील (धाकटी जुई), परशुराम रामा पाटील (पाणदिवे), हसुराम बुधाजी घरत (खोपटा), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे) या आठ जणांना वीरमरण आले तसेच ३८ सत्याग्रही जखमी झाले होते. **(पान २ वर..)**



**पनवेल : येथील रोज बाजार भाजी मार्केट व स्वयंसहाय्यता महिला मंडळाच्या गणेशोत्सवात रविवारी श्री सत्यनारायणाची पूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी तेथे जाऊन दर्शन घेतले. या वेळी मंडळाच्या अध्यक्ष व माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, युवा नेता सुमित झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



## भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदक जिंकले



**बीजिंग : वृत्तसंस्था**

चीनमधील हांगझाऊ येथे सुरू असलेल्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदक पटकावले आहे. अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेसमोर ११७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ २० षटकांत आठ गडी गमावून ९७ धावाच करू शकला.

भारताकडून फलंदाजीत स्मृती मंधानाने सर्वाधिक ४६ धावांची खेळी केली. जेमिमा रॉड्रिग्जने ४२ धावा केल्या, तर गोलंदाजीत तीतस साधूने तीन आणि राजेश्वरी गायकवाडने दोन विकेट घेत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अशा प्रकारे टीम इंडियाने अंतिम सामना १९ धावांनी जिंकून सुवर्णपदक पटकावले.

### नेमबाजांचाही 'सुवर्ण'वेध

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी सुवर्णपदक जिंकले आहे. १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात दिव्यांश सिंग पनवार, ऐश्वर्या प्रताप सिंग तोमर आणि रूद्रांक्ष पाटील यांनी एकूण १८९३.७ गुण मिळवत जागतिक विक्रम मोडला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यातील रूद्रांश हा ठाण्यातील रहिवासी आहे.




# १०० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण

## रूफ टॉप सोलरला ग्राहकांकडून प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात वीज ग्राहकांनी छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याबाबत केंद्र सरकारने दिलेले १०० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दीष्ट महावितरणने चार महिने आधीच पूर्ण केले आहे. उद्दीष्ट पूर्ण झाले असले तरीही महावितरण ही मोहीम यापुढेही सुरू ठेवणार आहे.



छतावरील सौरऊर्जा निर्मिती अर्थात रूफ टॉप सोलरमुळे ग्राहक स्वतःच वीजनिर्मिती करून वापरतात. त्यामुळे त्यांचे वीजबिल कमी होते. गरजेपेक्षा जास्त वीजनिर्मिती झाली तर त्यांना ती महावितरणला विकता येते. छतावरील सौरऊर्जा निर्मितीसाठी केंद्र सरकारकडून वीज ग्राहकांना ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळते.

केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने महावितरणला १९ जानेवारी २०२२ रोजी रूफ टॉप सोलार प्रोग्रॅम फेज-२ अंतर्गत १९ जानेवारी २०२४पर्यंत दोन वर्षांत घरगुती ग्राहकांसाठी १०० मेगावॅटचे उद्दीष्ट दिले होते. महावितरणने हे उद्दीष्ट सोमवारी (दि. २५) म्हणजे चार महिने आधीच पूर्ण केले.

केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयाला महावितरणकडून राज्यातील कामगिरीबाबत दर महिन्याला अहवाल पाठविण्यात येत आहे. कंपनीकडून राज्यात छतावरील सौरऊर्जा निर्मितीसाठी ग्राहकांना मदत करण्यात येते. याविषयीची माहिती https://www.mahadiscom.in/ismart या वेबसाईटवर उपलब्ध आहे. महावितरणने छतावरील सौरऊर्जा निर्मिती संच बसवून देण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा केली. संबंधित यंत्रणांशी चांगला समन्वय साधला. त्यामुळे चार महिने आधी उद्दीष्टपूर्ती करता आली. रूफ टॉप सोलरविषयी उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरणला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. राज्यात सोमवारी रूफ टॉप सोलर वापरणाऱ्या ग्राहकांची एकूण संख्या १,०६,०९६ झाली आहे. एकूण वीजनिर्मिती क्षमता १,६७५ मेगावॅट इतकी झाली आहे. राज्यात २०१६-१७ या आर्थिक वर्षात केवळ १,०७४ ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले होते व त्यांची एकूण क्षमता २० मेगावॅट होती.

### सरकारकडून अनुदान

सर्वसाधारणपणे एखाद्या कुटुंबाला तीन किलोव्हॅटचा सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प पुरेसा ठरतो. त्यासाठी सरकारकडून सुमारे ४३ हजार रुपये ते ५६ हजार रुपये अनुदान मिळते. तीन ते दहा किलोव्हॅट क्षमतेच्या प्रकल्पांना तीन किलोव्हॅटनंतर प्रत्येक किलोव्हॅटला सुमारे सात ते नऊ हजार रुपये अनुदान मिळते. हाऊसिंग सोसायट्यांना ५०० किलोव्हॅटपर्यंतचा प्रकल्प बसविता येतो व सार्वजनिक सुविधेसाठीच्या या प्रकल्पांना प्रति किलोव्हॅट ७,२९४ रुपये अनुदान मिळते.

# आशियाई स्पर्धेत ठाण्याच्या रुद्रांक्ष पाटीलसह तिघांची चमकदार कामागिरी

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाने नेमबाजीमध्ये एअर रायफल्स प्रकारात देशाला या स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक पटकावून दिले आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय संघातील नेमबाज रुद्रांक्ष बाळासाहेब पाटील, दिव्यांश सिंह पनवर, ऐश्वर्य सिंह तोमर यांचे अभिनंदन केले आहे. या संघाने जागतिक चॅम्पियनशीप स्पर्धेतील विक्रमही मोडीत काढला आहे. याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी या तिघांचे विशेष कौतुक केले आहे.



चीनमध्ये फुयांग (हांगजोऊ) येथे सुरू असलेल्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाजांच्या संघाने १० मीटर एअर रायफल्स प्रकारात चमकदार कामगिरी केली आहे. यात रुद्रांक्ष, ऐश्वर्य आणि दिव्यांश यांनी सुरवातीपासूनच कामगिरीत सातत्य ठेवून गुणांची कमाई करीत संघाला सुवर्णपदक मिळवून दिले. रुद्रांक्ष पाटील हा ठाण्याचा खेळाडू आहे. त्याच्या नेमबाजीतील नैपुण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाठबळ दिले आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी या तिघांचेही विशेष कौतुक म्हटले आहे की, भारताने नेहमीच आशियाई क्रीडा स्पर्धेवर वर्चस्व राखले आहे. यंदाच्या या स्पर्धेत सुरुवातच या तिघांनी नेमबाजीत सुवर्णपदकाचा वेध घेऊन केली आहे. यासाठी या खेळाडूंचे, त्यांच्या प्रशिक्षक-मार्गदर्शकांचे आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या कुटुबियांचेदेखील कौतुक करावे लागेल.

अशा जिद्दी आणि मेहनती खेळाडूंच्या कामागिरीच्या जोरावरच भारताची यंदाच्या या स्पर्धेतील कामागिरी अशीच दिमाखदार राहील आणि आपला भारत या स्पर्धेत पदकतालिकेत अव्वल राहील. या यशस्वीतेसाठी मुख्यमंत्र्यांनी स्पर्धेत सहभागी भारतीय खेळाडूंच्या चमुला शुभेच्छा दिल्या आहेत.

# कारची ट्रकला धडक; तीन जण जखमी



**पनवेल : वार्ताहर**

मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर कारचालकाचा ताबा सुटून ट्रकला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

श्रीकांत कोहनकर (वय २२, रा. पुणे) हा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून डस्टर (एमएच १२ जेयू ३०९६) गाडीने मुंबई बाजूकडे तिसऱ्या लेनने चालवित जात असताना त्याचा गाडीचा ताबा सुटून समोर असलेल्या मल्टी एक्सेल ट्रक (एमएच४९ एटी ३८६८)ला पाठीमागून धडक दिली. या धडकेत चालक श्रीकांत कोहनकर (वय २२, रा. पुणे), सुहास शिरसागर (वय ६२, रा. पुणे) यांना दोघांना गंभीर दुखापत झाली असून आशिष करमकर (वय ३५, रा. पुणे) हे किरकोळ जखमी झाले. त्यांना तत्काळ एमजीएम हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आले. अपघातग्रस्त कार क्रेनने बाजूला घेत वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**अलिबाग :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते, परंतु ऑक्टोबर २०२३ मधील पहिल्या सोमवारी २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे जिल्हास्तरीय लोकशाही दिन मंगळवारी (दि. ३) दुपारी १ वाजता जिल्हाधिकरी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित केला आहे, असे विठ्ठल इनामदार, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रायगड-अलिबाग यांनी कळविले आहे.

# मुरूड तालुक्यात मासेमारी हंगाम जोरात

## मासळीची आवक वाढली

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात मासळीचा हंगाम सुरू झाला असून सुमारे ७५० होड्या मासेमारीसाठी खोल समुद्रात गेल्या आहेत. त्यामुळे सध्या मार्केटमध्ये मासळीची आवक वाढली आहे. मोठ्या आकाराची सुरमई, पापलेट, हलवा, रावस, कोळंबी, बांगडे, ओले बोंबील मार्केटमध्ये दिसू लागले आहेत.

१ ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाल्यानंतर काही दिवसानंतर मासळी मुबलक मिळण्यास सुरुवात झाल्याने मार्केटमध्ये लिलावाद्वारे मासे विक्री होऊ लागली आहे. दहा दिवसांचे गणपती असल्याने काही नागरिक शाकाहार घेत आहेत, परंतु दहा दिवसांचे गणपती जाताच पुन्हा मासळीची मागणी वाढवून भाव वधारले जाणार आहेत.



सध्या तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी झाले असून कधी ऊन तर कधी पाऊस पडत असल्याने मासेमारीसाठी उपयुक्त वातावरण तयार झाले आहे. मासेमारीसाठी गेलेल्या सर्वच बोटींना मासे मिळत असल्याने स्थानिक मच्छिमार सुखावले आहेत. तालुक्यात राजपुरी, एकदरा, मुरूड, मजगाव, दांडा, काशिद, बोर्ली, कोर्लई, साळाव व चोरढे मिळून ७५०हून अधिक मासेमारी नौका सध्या मासेमारीसाठी व्यस्त झाल्या आहेत.

याबाबत रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, सध्या मासळीचा चांगला हंगाम सुरू झाला आहे. मुबलक मासळी मिळू लागल्याने ज्या मासळीला चांगला भाव आहे, अशी मासळी निर्यातसुद्धा होऊ लागली आहे. सध्या तरी मासळी चांगली मिळत आहे, परंतु यामध्ये सातत्य राहणे खूप आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निसर्गाचे कोणतेही वादळ होता काम नये तर मासळी व्यवसाय टिकून राहणार आहे.

# धनगर आरक्षणाबाबतचे पत्र घेऊन ना. महाजन चौंडीला जाणार

**मुंबई : प्रतिनिधी**

धनगर समाजाला अनुसूचित जमाती संवर्गात आरक्षण मिळावे यासाठी अनेक वर्षांपासून धनगर समाज लढा देत आहे. गेल्या २० दिवसांपासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी येथे यशवंत सेनेच्या माध्यमातून धनगर समाज आमरण उपोषणाला बसला आहे. धनगर समाजाला एसटीमध्ये सामावून घेण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आयवासनाचे पत्र घेऊन जलसंधारणमंत्री गिरीश महाजन मंगळवारी (दि. २६) सकाळी चौंडी येथे जाणार आहेत.

मागील काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सुरू केले होते. त्यांना आश्वासन देऊन त्यांचे उपोषण मागे घेण्यात यश मिळविले. त्याचदरम्यान राज्यात ओबीसी, धनगर समाजदेखील आरक्षणाच्या मुद्द्यावर आक्रमक झाल्याने सरकारने पावले उचलली आहेत. चौंडी येथे यशवंत सेनेच्या माध्यमातून धनगर समाज बेमुदत उपोषणाला बसला आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनामध्ये धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षणाचा वटहूकुम काढावा, ही प्रमुख मागणी धनगर समाजाने केली होती.

दरम्यान, शिंदे-फडणवीस सरकारने धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष घालत आता हे उपोषण सोडविण्यासाठी भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन हे मंगळवारी सकाळी विमानाने बारामती येथे आणि तेथून चौंडीला जाणार आहेत. ओबीसी, भटके विमुक्त खात्याचे मंत्री अतुल सावे तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाचे पत्र घेऊन महाजन धनगर समाजातील उपोषणकर्त्यांची भेट घेणार असून त्यांनी उपोषण मागे घ्यावे यासाठी विनंती करणार आहेत.

# नाशिक येथील तरुणाची खालापुरात आत्महत्या

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावरील कोपरी गावच्या हद्दीत असलेल्या पुलाखाली नाशिक येथील तरुणाने गळफास घेतल्याची माहिती मासेमारी करणाऱ्या व्यक्तीने देताच खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार घटनास्थळी दाखल झाले.

या तरुणाच्या पॅन्टचे खिशात मोबाईल, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्रे आढळून आली. योगेश अशोक बोरसे (वय ३६) असे तरुणाचे नाव असून तो मांदेवाड, नाशिक येथील आहे. उच्चशिक्षित आणि पुणे येथे चांगल्या कंपनीत असलेल्या योगेशचे लग्न जुळत नसल्याने नैराशतून आत्महत्या केल्याचा अंदाज त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

पान १ वरुन

## माथाडी कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासन वचनबद्ध

या माध्यमातून तब्बल पाच हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत या नवउद्योजकांना देण्यात आली. या उद्योजकांवर व्याजाचा बोजा पडू नये, यासाठी ५६० कोटींचा व्याज परतावा महामंडळाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे 'सारथी'च्या माध्यमातून मराठा समाजातील अनेक विद्यार्थी आयएएस आयपीएस झाले, अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या मदतीमुळे परदेशात उच्च शिक्षणासाठी जाऊ शकले, कौशल्य विकासाचे कामही जोमाने सुरू आहे. स्व.अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मोठा संघर्ष केला. हा विषय आता पुन्हा ऐरणीवर आला आहे. या संदर्भात कायद्याच्या चौकटीत राहून समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करू. हे शासन मराठा समाजाचे प्रश्न संवेदनशीलपणे सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

या मेळाव्याच्या निमित्ताने संघटनेचे सरचिटणीस तथा महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी माथाडी कामगारांच्या मागण्या व समस्या मांडल्या. ते म्हणाले की, माथाडी कामगारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बनावट माथाडींवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी. बाजार समितीच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा. स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला सिडकोच्या माध्यमातून कार्यालयासाठी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावी तसेच एपीएमसीमध्ये माथाडी कामगारांना घरेही देण्यात यावीत.

या वेळी माजी मंत्री व आमदार गणेश नाईक, शशिकांत शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. शेवटी या कार्यक्रमाच्या निमित्ताने १८ कामगारांना माथाडी भूषण पुरस्काराने उपमुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## साधी राहणी व उच्च विचारसरणीने विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग भरारी घ्यावी

रयत शिक्षण संस्था ही राज्यातील सोळा जिल्ह्यांमध्ये विस्तारली असून लाखो विद्यार्थी संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण घेतात हे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दूरदृष्टीचे फलित असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी नमूद केले.

प्रमुख व्याख्याते फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.संदीप घोडके यांनीही कर्मवीर अण्णांच्या जीवनातील निवडक प्रसंग सांगून त्यांच्या विचारांनी प्रेरित झालेली पिढी घडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कर्मवीर अण्णांनी आपल्या जीवनात राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यक्ष प्रयोग साकार करून भल्याभल्यांना अचंबित केले व श्रमसंस्काराचा मंत्र बहुजन समाजाला दिल्याचे सांगताना प्रा. घोडके यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, लोकसंत गाडगेबाबा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तीन महामानवांच्या भेटीचे प्रसंग वर्णन केले.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी.देशमुख यांचेही प्रासंगिक भाषण झाले. विद्यार्थ्यांच्या वतीने प्रतिनिधिक मनोगत व्यक्त करताना इयत्ता सहावीचा विद्यार्थी स्मित कुंदन मोकल याने कर्मवीर अण्णांच्या जीवनातील काही प्रसंग अत्यंत सफाईदारपणे सांगून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्याच्या वक्तृत्व शैलीचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पारितोषिकसाठी संस्थेकडे १० लाख रुपये कायम ठेव ठेवल्याबद्दल, वसंतशेठ पाटील यांनी एक लाख रुपयांची कायम ठेव ठेवल्याबद्दल, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनीही ७५ हजार कायम ठेव पारितोषिकांसाठी ठेवल्याबद्दल त्याचप्रमाणे दरवर्षी एसएससी परीक्षेतील विज्ञान व गणित विषयातील प्राविण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना १० हजार रुपयांचे बक्षीस ठेवल्याबद्दल जनरल बॉडी सदस्य वाय. टी.देशमुख या सर्व मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने ऋणनिर्देश व्यक्त करण्यात आले.

प्रारंभी साई संगीत विशारद साई मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या गायकवृंदाने रयत गीत आणि स्वागत गीत सादर केले. विद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी प्रास्ताविक व अहवाल वाचन केले. उपशिक्षक सागरकुमार रंधवे यांनी सूत्रसंचालन केले, तर संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या सोहळ्यास माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवशेठ ठाकूर, विद्यालयाचे उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, सी.एल.ठाकूर, चंद्रकांत कोळी, युवा नेते किशोर पाटील, जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, राजेंद्र देशमुख, सुधीर ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कमलाकर देशमुख, लाईफ वर्कर अरुण घाग, विभागीय कार्यालयाचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, इंदुताई घरत, काशिनाथ घरत, अजयशेठ भगत, शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन शरद खारकर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर, रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष नुरा शेख, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्य प्रणिता गोळे, ज्युनिअर विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे आदींसह पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृतिदिन साधेपणाने

या हौतात्म्यांचे स्मरण करण्यासाठी आणि नव्या पिढीलाही इतिहास ज्ञात व्हावा यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी चिरनेर येथील हुतात्मा स्मारकासमोर त्यांचा स्मृतिदिन कार्यक्रम होतो. या वेळी हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात येते व हवेत बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय मानवंदना दिली जाते. यंदाही हा कार्यक्रम झाला.





**मुंबई : एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात सोमवारी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, प्रदेश मुख्यालय सहप्रभारी सुमंत घैसास, ज्येष्ठ कार्यकर्ते मोहन काणे, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.**


MAHATRANSCO

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender

| Specification | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -04/2023-24 **Name of Tender** : E-Tender for the work of repair & maintenance of high mast lighting tower alongwith consumable material at Major Stores, Panvel for FY 2023-24. **Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST RFx No.- 7000028640** | **Online Downloading the RFx** :Dt.26.09.2023,00:00Hrs.to 02.10.2023,23:59Hrs.**Online Submission of the RFx** :On or Before Dt.02.10.2023,23:59Hrs.Online **Opening of the Techno Commercial RFx**:Dt. 03.10.2023, at 11:00 Hrs.(If possible ).**Online Opening of the Price bid**:Dt.03.10.2023 at 15:00Hrs.(If possible) |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
Contact Person: -The Executive Engineer, Mobile No. 9930057633
Note : All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Executive Engineer (I/C)**
**Major Stores, Panvel**

# ३० वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यांचा छडा

## पनवेल पोलिसांच्या विशेष मोहिमेंतर्गत तीन खुनी अटकेत

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

विशेष मोहिमे अंतर्गत पनवेल शहर ठाण्याच्या हद्दीतील ३० वर्षांपूर्वीचे तीन खूनाचे गुन्हे अवघ्या उघडकीस आणले. पंजाब, तेलंगणा व उत्तर प्रदेशातून आरोपींना अटक केल्याबद्दल पनवेल शहर पोलिसांचे कौतुक होत आहे.

पोलीस उपआयुक्त, परिमंडळ ०२ पंकज डहाणे यांनी खून व इतर गंभीर गुन्हयातील अभिलेखावरील फरारी आरोपीचा शोध घेवून त्यांच्यावर कार्यवाही करण्याकरिता विशेष मोहिम राबविणेबाबत आदेश दिले होते. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले होते. पोलीस पथकांनी पोलीस ठाण्यातील ३० वर्षे जुने अभिलेख पडताळलेअसता खून या शिर्षकाखाली दाखल असलेले गुन्हा रजि. नं. ११८/२०१६ भा. दं. वि. कलम ३०२, ३४, गुन्हा रजि. नं. २१४ / २०१६ भा. दं. वि. कलम ३०२, २०१, ३४ व गुन्हा रजि. नं. २१२/१९९४ भा. दं. वि. कलम ३०२,



२०१ ३४ या गुन्हयातील आरोपी सापडले नसल्याचे दिसून आले. स्थानिक बातमीदार व तांत्रिक तपास केला असता सदर तिन्ही गुन्ह्यांतील पाहिजे आरोपी मिर्झापूर (उत्तर प्रदेश), सिद्धीपेठ (तेलंगणा) व अमृतसर (पंजाब) या जिल्ह्यात आपले अस्तित्व लपवुन असल्याचे खात्रीशीर माहिती मिळाली. प्राप्त माहितीच्या आधारे पोलीस पथकांनी स्थानिक पोलिसांशी समन्वय साधुन व त्यांची मदत घेवुन तीन्ही गुन्हयातील आरोपींचा शोध घेवुन अधिक तपासासाठी ताब्यात घेतले. यापैकी गुन्हा रजि. नं. २१२/१९९४ मधील पाहिजे आरोपी नामे बाऊसिंग हा तपासा दरम्यान मयत झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचे मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

तिन्ही गुन्हयातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस मित्र राहुल राठोड यांनी पोलीस पथकांना मदत केली. पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहआयुक्त संजय मोहिते यांनी केलेल्या सुचनेनुसार उपआयुक्त पंकज डाहणे, सहाय्यक आयुक्त अशोक राजपुत यांचे आदेशानुसार तसेच पनवेल शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंजुम बागवान व पोलीस निरीक्षक (प्रशा) प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, शिपाई प्रसाद घरत, साईनाथ मोकल ,पोशि नितीन कांबळे, नाईक रवींद्र पारधी आदींसह तपास पोलीस पथकांनी केली आहे. यात त्यांनी बिट्टूसिंग उर्फ अर्जुनसिंग व नगिना उर्फ चंक्कीपांडे सिद्धी कौल (वय ३४) व राजू सिंगसानी या तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

# सामाजिक कार्य करताना लोकांची सेवा होते -राजू सोनी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्य करताना लोकांची सेवा करण्यात वेळ घालवता येतो. आपल्याला मिळालेले आयुष्य हे क्षणिक असून या आयुष्यात दिनदुबळ्यांची, अडल्या नडलेल्याला मदत करावी. संत महात्म्यांनी सांगितल्याप्रमाणे जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी जनसेवा करणार असल्याची ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांनी दिली.



माजी नगरसेवक राजू सोनी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमधील राजकीय, सामाजिक, साहित्य, पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सोनी यांची भेटच घेऊन शुभेच्छांचा वर्षाव केला. या वेळी समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करताना ते बोलत होते. गरजूंना मदत करताना मला नेहमीच समाधान लाभते. तसेच आज माझ्या वाढदिवसानिमित्त मी प्रामुख्याने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांचे विशेष आभार मानतो. त्यांनी मला नगरसेवक होण्याची संधी दिली आणि मला माझ्या आवडीचे समाजकार्य करण्याचे काम मिळाले. मला गोरगरिबांची सेवा करण्याची आवड आणि त्यांच्या बिकट परिस्थितीची जाण पहिल्यापासून आहे हे त्यांच्या कानावर गेल्यावर त्यांनी मला निवडणुकीसाठी तिकीट दिले.

यानिमित्ताने मी लोकांना आवाहन करू इच्छितो की, मदतीसाठी केंव्हाही माझ्याकडे या. शहरातील अडचणी, पोलीस स्टेशन किंवा कोणत्याही प्रशासकीय कामासंदर्भात माझी काही मदत लागल्यास मी रात्रंदिवस उपलब्ध आहे.

## नवीन पनवेलध्ये स्वर श्रद्धांजली कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कै. पंडित रामचंद्र गुंडो देसाई यांच्या ३३व्या पुण्यतिथीनिमित्त स्वर श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन स्वरमयी गुरूकुल, पुणे संचलित श्री. शांताराम संगीत विद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या शिष्या डॉ. जानकी मिठाईवाला यांच्या शास्त्रीय संगीत गायनाचा हा कार्यक्रम १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत नवीन पनवेल सेक्टर २ येथील कर्नाटक संघ हॉलमध्ये होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन निमंत्रक वीणा कुलकर्णी यांनी केले आहे.

## पंडित दिनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानपालिकेच्या मुख्यालयात सोमवारी (दि. २५) पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त कैलास गावडे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, सचिव विभाग प्रमुख तिलकराज खापर्डे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, कर्मचारी उपस्थित होते.






**पनवेल : प्रखर राष्ट्रप्रेमी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**



**कळंबोली : पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त भाजप कळंबोली मंडलतर्फे अभिवादन करण्यात आले. या वेळी भ. वि. आ.चे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, मंडल सरचिटणीस दिलीप बिष्ट, प्रभाग ८चे अध्यक्ष प्रकाश शेलार, उपाध्यक्ष संदीप भगत, सेक्टर प्रमुख रवी पाटील व मंडळ सदस्य रवी जाधव उपस्थित होते.**

## महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये १३६वा पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा बुधवारी (दि. २७) सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे व्यवस्थापकीय समितीचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे असून प्रमुख पाहुणे म्हणून कोकण विभागाचे विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) डॉ. केशव तुपे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमावेळी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, महेंद्र घरत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. महाविद्यालयातील सर्व आजी माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आंतरराष्ट्रीय तायक्वोंडो पंच सुभाष पाटील यांच्या घरी विराजमान गणपतीचे दर्शन घेतले.**



**पनवेल : भाजप जि. प. पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी वाजे गावच्या सरपंच मथुराबाई मदन पाटील यांच्या घरात विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.**



**डोंबिवली : प्रवीण सूर्यराव यांच्या घरातील विराजमान बाप्पा.**



**पनवेल : गव्हाणचे उपसरपंच विजय घरत यांच्या कोपर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. त्यांचे घरत यांनी स्वागत केले. या वेळी भाऊशेठ भोईर, अनंताशेठ ठाकूर, विघ्नेश घरत, विक्रांत घरत उपस्थित होते.**







**पनवेल : मयुरेश खिस्मतराव यांच्या घरात विराजमान गणपतीचे भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी दर्शन घेतले.**



**पनवेल : रवींद्र मैलुरकर यांच्या घरी विराजमान गणरायाचे युवोन्मेष समूहाने दर्शन घेतले.**



**भैरवी संजय रावले, अलिबाग**



**जिद्धेश नरेश मोकल, चिरनेर, उरण**



**अभिराज यशश्री वैद्य, अलिबाग**



**चित्रांश म्हात्रे, डोंगरी**



**पनवेल : माजी नगरसेवक नितीन पाटील कार्याध्यक्ष असलेल्या अभिनव युवक मित्र मंडळाच्या पायोनिअरच्या राजा गणपती उत्सवात महिलांसाठी पाककला स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, बाल्या डान्स, सहस्त्रवर्तन, महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, लहान मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा, भजन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. रविवारी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी विभागातील अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.**

## संपादकीय

# पराचा कावळा

भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे सध्या उरल्यासुरल्या विरोधकांच्या थिल्लर कारस्थानांचे लक्ष्य बनू पाहात आहेत असे दिसते. अहमदनगर येथे 'महाविजय २०२४' अभियानाच्या अंतर्गत काही पक्षपदाधिकाऱ्यांना बावनकुळे यांनी संबोधित केले. त्यांच्या अनौपचारिक गप्पांची ध्वनिफीत समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाली. यामध्ये बावनकुळे यांनी पदाधिकाऱ्यांना आक्षेपार्ह सल्ले दिल्याचे ऐकू येते असा विरोधकांचा दावा आहे.

**निवडणुकीचा काळ जवळ येत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. निवडणुकांचे वेध लागले की सर्वच राजकीय पक्ष आपापली अस्त्रे परजून तयार ठेवू लागतात. नेमक्या कुठल्या मुद्यांवर शत्रूपक्षाला घेरायचे आहे याची रणनीती ठरवण्याचे हेच ते दिवस. राष्ट्रीय पातळीवर सोळासतरा अपयशी विरोधीपक्षांचे 'इंडिया आघाडी' नावाचे कडबोळे तयार झाले ते केवळ निवडणुकांची चाहुल लागल्यामुळेच. एरव्ही या पक्षांचे नेते एकमेकांची तोंडेदेखील पाहात नाहीत, परंतु ईडी आणि अन्य तपासयंत्रणांच्या ससेमिऱ्यामुळे जिवाच्या आकांताने हे सारे नेते आणि त्यांचे पक्ष एकत्र आले आहेत. केंद्रातील मोदी सरकारला घेरण्यासाठी मुद्दे शोधण्याची धडपड ते करत आहेत. अर्थात पंतप्रधान मोदी यांच्यासारखा महान नेता या घमंडिया आघाडीला पुरून उरेल याची मतदारांनाच खात्री वाटते. पंतप्रधान मोदी यांना आजतरी कुठलाही पर्याय दिसत नाही. नजीकच्या भविष्यकाळातही त्यांची जागा घेऊ शकेल असे नेतृत्व मिळणे अशक्यप्राय दिसते. राज्य पातळीवर मात्र विविध राज्यांमध्ये राजकारणाचे वेगवेगळे रंग बघायला मिळत आहेत. महाराष्ट्रातील राजकारणाबाबत बोलायचे झाले तर विरोधीपक्ष किंवा तथाकथित महाविकास आघाडी उरलीच आहे कुठे? अखंड शिवसेना फुटून मूळ पक्षाची शकले उडाली आहेत आणि सत्तेमधील त्यांचा जोडीदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही काही वेगळ्या अवस्थेत नाही. काँग्रेसला तर राज्यात कुठला आवाजच उरलेला नाही. अशा परिस्थितीत समाजमाध्यमांतील काही निवडक लोकांना हाताशी धरून भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना लक्ष्य करण्याची चाल खेळली जात आहे. हा उद्योग तसा स्वस्तातला. शिवाय समाजमाध्यमांच्या आड राहून नामानिराळे राहता येते ते वेगळेच. 'भाजपच्या विरोधात २०२४च्या निवडणुकांपर्यंत बातम्या प्रसिद्ध होऊ नयेत म्हणून निवडक पत्रकारांना चहा प्यायला न्या किंवा ढाब्यावर घेऊन जा, असा सल्ला भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्याचा दावा केला जात आहे. निवडक पत्रकारांना ढाब्यावर न्यावे म्हणजे नेमके काय करावे हे तुम्ही समजून जालच अशा आशयाची टिप्पणी या संवादादरम्यान बावनकुळे यांनी केली असाही दावा केला जात आहे. यावरून सोमवारी दिवसभर राजकीय वर्तुळात एकच गदारोळ उठला. समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया ओसंडून वाहू लागल्या. अनेक वृत्तवाहिन्यांनी स्वत: कुठलीही पुष्टी न करता ती ध्वनिफीत प्रक्षेपित केली. खरे तर या ध्वनिफितीच्या सत्यतेविषयी पडताळणी होण्याची गरज आहे. बावनकुळे यांनी ज्या काही सूचना पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना केल्या, त्यात आक्षेपार्ह नेमके काय आहे हे समजू शकत नाही. पत्रकारांना चहापाणी किंवा मेजवान्या देणे ही काही राजकीय पक्षांसाठी नवीन गोष्ट नाही. राजकारणच कशाला, कॉर्पोरेट कंपन्यादेखील जनसंपर्कासाठी हाच मार्ग अवलंबतात. पत्रकारांना चहा देऊ केला किंवा भोजनासाठी ढाब्यावर नेले याचा अर्थ त्यांना विकत घेतले असा होत नाही. बावनकुळे यांच्या वक्तव्याचा विपर्यास करणे अत्यंत अयोग्य आहे अशी नाराजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे, ती योग्यच मानायला हवी.**

# सावधान! बँकांतील ठेवी असुरक्षित?




पतसंस्था, खासगी बँका नंतर आत सर्वसामान्य नागरीकांच्या विश्वासाच्या समजल्या जाणाऱ्या राष्ट्रीय बँकामधील ठेवीदेखील असुरक्षित झाल्या आहेत. असे जर होणार असेल तर सामान्य माणसाने आपल्या कष्टाचे पैसे ठेवायचे तरी कोठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. बँकाच्या ऑनलाईन प्रणालीत सामान्य ग्राहकांची फसवणूक मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. हातात स्मार्टफोन फोन तर आले पण आम्ही स्मार्ट झालो नाही. त्यामुळे विविध प्रलोभने दाखवून ग्राहकांना गंडा घालण्याचे प्रकार वाढू लागले आहेत. यात उद्‌ध्वस्त होतो तो सर्व सामान्य नागरीक मात्र यंत्रणा हात वर करुन मोकळी होते. बँक म्हणते पोलिसांत तक्रार कर आणि पोलीस म्हणतात लुटारू दुर देशात बसलाय आम्ही कस पकडायच त्याला?

महाड तालुक्यातील वराठी येथील निवृत्त एसटी कर्मचारी प्रभाकर गोठल यांनी आपल्या आयुष्यभराच्या मेहनतीची निवृत्तीनंतर मिळालेली १४ लाखांची रक्कम महाडमधील स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखेत ठेवीच्या स्वरूपात एका वर्षासाठी ठेवली. या ठेवीवर खातेदाराच्या अपरोक्ष ऑनलाईन सुमारे ७ लाख ४५ हजाराचे कर्ज दोघा भामट्याने उचलले. ज्यावेळी खातेदाराला ठेवीच्या नुतनीकरणासाठी बोलावण्यात आले त्यावेळी त्यांच्या ठेवीवर वरील कर्ज घेतले असल्याचे सांगण्यात आले ज्याची त्या खातेदाराला कोणतीच कल्पना नव्हती. आपली आयुष्यभराची कमाई अशा पद्धतीने लुटली गेल्याचे समजताच त्याचे अवसानच गळले. त्याने आपण हे कर्ज उचललेच नाही आणि ठेवीच्या मुळ पावत्या आपल्याकडेच आहेत असे सांगत बँकेने आपली सर्व रक्कम व्याजासह नुतनीकरण करावी अशी मागणी केली, मात्र बँक व्यवस्थापकाने हात वर करीत या कर्जाच्या व्याजाची आकारणीदेखील ठेवीदाराचे खात्यावर केली.

बँकेच्या ऑनलाईन व्यवहाराशी अज्ञानी असलेल्या ठेवीदाराची झालेली फसवणुक पाहता अशा प्रकारे ऑनलाईन कर्ज देताना कोणत्याही प्रकारची सुरक्षितता बाळगली जात नसल्याचे या प्रकारानंतर समोर आले असून राष्ट्रीयकृत बँकांमध्ये असणार्या ठेवी असुरक्षित असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात आहे.

प्रभाकर शंकर गोठल हे निवृत एसटी कर्मचारी आहेत. यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, महाड शाखेत २६

**खबरबात**
**महेश शिंदे**

ऑगस्ट २०२२ रोजी १४ लाख रुपये (निवृत्ती नंतर मिळालेली रक्कम) एक वर्षासाठी मुदत ठेव म्हणून ठेवली होती. ७ ऑगस्ट २०२३ रोजी ठेवीची मुदत संपण्यापुर्वी बँकेतून ठेवीचे नुतनीकरण करावे असा मेसेज त्यांच्या मोबाईलवर आल्याने ते चौकशीसाठी गेल्यानंतर त्यांचे ठेवीवर २८ डिसेंबर २०२२ रोजी एकुण सात लाख ४५ हजाराचे कर्ज टप्या टप्याने ऑनलाईन काढण्यात आल्याचे दिसून आले. बँकेतून कर्ज देताना कोणतेही दस्तऐवज न स्विकारता, ठेवीची पावती शाखेत जमा केली नसतानाही कर्ज कसे देण्यात आले याबाबत गोठल यांनी शाखा व्यवस्थापक यांचेकडे विचारणा केली असता कर्ज मंजूर करताना आपल्या मोबाईलवर ओटीपी क्रमांक आला असता तो एक्सेप्ट केल्यानेच हे कर्ज देण्यात आले असे सांगून आपले हात वर केले.

तपासाअंती २८ डिसेंबर २०२२ रोजी १३०००० रुपये, २४५००० रुपये, ३७०००० रुपये असे एकुण सात लाख ४५ हजाराचे कर्ज काढण्यात आले. हे कर्ज दिल्ली येथील कुलमणी मलिक व शेख अशा दोघा इसमांनी उचलून दिल्ली येथील त्यांच्या फेडरल बँकेच्या खात्यात जमा केले असल्याचे समोर आले आहे. हे कर्ज आपण घेतले नसून ठेवीच्या मुळ प्रमाणपत्रही आपल्याकडे असल्याने आपल्यावर लादलेला कर्जाचा बोजा त्वरीत उतरवून ठेवी पुर्ववत केल्या जाव्यात, अशी मागणी प्रभाकर गोठल यांनी केली असून या फसवणुकी प्रकरणी सायबर सेल व महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना महाड युनिटच्या वतीनेही स्टेट बँक ऑफ इंडीया महाड शाखेला निवेदन देऊन प्रभाकर गोठल यांना त्यांची पुर्ण ठेव रक्कम व्याजासह ३० दिवसांत न दिल्यास रा.प. सेवा निवृत्तांच्या सर्व ठेवी शाखेतून काढून घेऊन न्यायासाठी आंदोलन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

# मराठी संगीत नाटककार, पत्रकार विद्याधर गोखले

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले.

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा आज स्मृतिदिन. विद्याधर गोखले हे मराठी पत्रकार व संगीत नाटककार होते. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९२४ रोजी अमरावती या ठिकाणी झाला. अमरावतीत पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४४ मध्ये ते मुंबईला आले. जनरल एज्युकेशन सोसायटीच्या कुर्ला येथील शाळेत इंग्रजी, मराठी, संस्कृत विषयाचे त्यांनी अध्यापन केले. त्यानंतर त्यांनी दैनिक लोकसत्तामध्ये बरीच वर्षे पत्रकारिता केली व त्यानंतर पाच वर्षे त्यांनी संपादक म्हणूनही काम पाहिले.

पत्रकारिता करीत असताना वृत्तपत्राबरोबरच त्यांची लेखणी नाट्यलेखन करू लागली. संगीत नाटकांच्या परंपरेचा वारसा त्यांनी पुढे चालविला. त्यांनी एकूण १८ नाटके लिहिली. त्यापैकी काही ऐतिहासिक, पौराणिक, तर काही सामाजिक विषयांवर आधारित आहेत. त्यांची संगीत नाटके तर लोकप्रिय झालीच, पण त्यातील पदांनी आजपर्यंत मराठी मनाला भुरळ घातली आहे.

'झंझावात' (कादंबरी), नाटके–'संगीत अमृत झाले जहराचे' (१९६५), 'इब्राहिमखान गारदी', 'संगीत चमकला ध्रुवाचा तारा' (१९६९), 'संगीत जय जय गौरीशंकर' (१९६६), 'जावयाचे बंड', 'संगीत



पंडितराज जगन्नाथ' (१९६०), 'बरसते सूर्यातून चंद्रिका', 'बावनखणी' (१९८३), 'संगीत मदनाची मंजिरी' (१९६५), 'संगीत मंदारमाला' (१९६३), 'संगीत मेघमल्हार' (१९६७), 'रूपरंजनी', 'राणी रूपमती', 'साक्षीदार' (१९६०), 'सुंदरा मनामध्ये भरली', 'संगीत सुवर्णतुला' (१९६०), 'संगीत स्वरसम्राज्ञी' (१९७३) इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचे लेखन मात्र गांभीर्यापेक्षा रंजकतेकडे अधिक झुकणारे होते. राजकीय लेखनही ते साहित्यिक शैलीने नटवत. लेखन सालंकृत करण्यावर त्यांचा अधिक भर असे.

संस्कृत व उर्दू साहित्याचा त्यांचा चांगला अभ्यास होता. त्यातील वचने व कल्पना ते आपल्या अग्रलेखात वापरत. सरळ, सुबोध अशा त्यांच्या लेखनात विनोदाचा शिडकावाही असे. प्रक्षोभक लिहिण्यापेक्षा मुद्यांकडे, भाषेच्या व शब्दांच्या नेटक्या वापराकडे संपादकाने लक्ष द्यायला हवे, असे त्यांचे मत होते. अशा या प्रतिभावान नाटककाराचे २६ सप्टेंबर १९९६ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# जिओ एअरफायबरमुळे पाहता येणार ५५०पेक्षा जास्त चॅनेल्स

रिलायन्स जिओने काल आपले जिओ एअरफायबर लॉन्च केले आहे. गेल्या महिन्यात झालेल्या कंपनीच्या




४६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांनी ही घोषणा केली होती. जिओ एअर फायबर ही एक वायरलेस वाय फाय सेवा आहे. घरे आणि कार्यालयांना वायरलेस ब्रॉडबँड सेवा प्रदान करणार आहे. जिओ एअर फायबरच्या येण्यामुळे दूरसंचार क्षेत्रात क्रांती घडण्याची शक्यता आहे. रिलायन्स जिओ एअरफायबर सध्या अहमदाबाद, बंगळुरू, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, मुंबई व पुणे या आठ शहरांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

दुर्गम भागांमध्ये इंटरनेट देण्याबरोबरच जिओ फायबर एचडीमध्ये वापरकर्त्यांना ५५०पेक्षा जास्त डिजिटल टीव्ही चॅनेल ऑफर करणार आहे. ज्यामध्ये नेटफ्लिक्स, डिस्नी+ हॉटस्टार, सोनी लिव्ह, झी ५, जिओसिनेमा आणि SunNXT, Hoichoi, डिक्सव्हरी प्लस, युनिव्हर्सल प्लस, अल्ट बालाजी, Eros Now, Lionsgate Play, शेमारूमी Docubay आणि एपिकव सारखे १६ ओटीटी App मोफत मिळणार आहेत. कंपनी कोणत्याही अतिरिक्त किंमतीशिवाय वाय फाय राउटर, ४ के स्मार्ट सेट अप टॉप बॉक्स आणि व्हॉइस रिमोटदेखील देणार आहे. याबाबतचे वृत्त The Indian Express ने दिले आहे.

जिओ एअरफायबरचा सर्वांत स्वस्त प्लॅन हा ५९९ रुपयांचा आहे. यामध्ये वापरकर्त्यांना 30 mbps चा स्पीड आणि १४ ओटीटी Apps ऑफर करण्यात येतो. तुम्हाला जर का अधिक स्पीड हवा असल्यास तुम्ही ८९९ रुपयांचा प्लॅन घेऊ शकता. यात मिळणारे लाभ हे ५९९ रुपयांच्या प्लानप्रमाणेच आहेत, मात्र स्पीड हा 100 mbps इतका मिळतो. ज्या वापरकर्त्यांना नेटफ्लिक्स, Amazon प्राइम आणि जिओसिनेमा प्रीमियम हवे आहे त्यांच्यासाठी कंपनीने १,१९९ रुपयांचा प्लॅन आणला आहे. ज्यात 100 mbps स्पीड आणि अनलिमिटेड डेटा व ५५० पेक्षा जास्त चॅनेल्सचे फायदे मिळतात.

जिओ एअरफायबर मॅक्स प्लॅन हा १,४९९ रुपयांचा असून हा पॉकेट फ्रेंडली प्लॅन आहे. हा महिन्याला 300 mbps चा स्पीड ऑफर करतो. तथापि, २,४९९ आणि ३,९९९ रुपयांच्या प्लॅनमध्ये जास्त करून 500 mbps आणि 1000 mbps चा स्पीड मिळतो. मात्र हे केवळ निवडक ठिकाणी उपलब्ध आहे.

# अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक देव आनंद

देव आनंद यांचा जन्म २६ सप्टेंबर १९२३ला पंजाबच्या गुरदास कस्बेमध्ये झाला होता. हिंदी चित्रपटसृष्टीत देवानंद याचे नाव रोमांसचे बादशहा म्हणून आहे. त्यांनी आपल्या आत्मकथेतही 'रोमांसिंग विद लाईफ' या शीर्षकाने सुरुवात केली आहे. देश-विदेशातून याचे स्वागत झाले. आपले फिल्मी जीवन प्रेममय करणाऱ्या व इतरांना जीवनाची उमेद देणाऱ्या देवसाहेबांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या 'रोमासिंग' चित्रपट प्रवासावर एक नजर फिरवू.

सुरुवातीस सुरैयांच्या प्रेमात गुरफटलेल्या देवसाहेबांच्या रोमान्सचे अनेक किस्से मुंबईच्या मरीन ड्राइव येथील कृष्णा महालाच्या समोर गाजले. आपला आवाज आणि फोटोंच्या माध्यमातून ते प्रत्येक हॉटेल, पान दुकानांमध्ये पोहोचले. सुरैयांच्या चाहत्यांची त्या ठिकाणी गर्दी होऊ लागली. सुरैया यांना मिळवण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती, पण भारत–पाकिस्तान फाळणी आणि हिंदू–मुस्लिम यांच्यातील दरी त्यांच्या प्रेमाच्याही आड आली. चित्रपटातील नकली दारे आता त्यांच्या आयुष्यात उभी राहिली होती. देवसाहेबांनी 'टॅक्सी ड्रायवर' या चित्रपटाच्या सेटवरच कोणाला काही कळायच्या आत आपली नायिका कल्पना कार्तिकाबरोबर दहा मिनिटांत लग्न केले. याबरोबरच सुरैया



**निमित्त**

प्रकरणाला पूर्णविराम मिळाला, पण सुरैया त्यांचे प्रेम विसरू शकल्या नाहीत आणि त्या अविवाहित राहिल्या.

देवानंद यांना नव्या नायिकांबरोबर रोमांस करणे, सेटवर दंगामस्ती करणे आणि वेगळ्याच धुंदीत प्रेमगीते म्हणण्याची म्हणण्याची सवय होती. गीताबाली यांच्याबरोबर त्यांनी बाजी, जाल, फरार आणि मिलाप या चित्रपटांमध्ये आपली रोमांटिक इमेज कायम राखली. त्या काळातील सर्वात सुंदर अभिनेत्री मधुबाला यांनाही त्यांनी आकर्षित केले होते. निराला, नादान, जाली नोट आणि अरमान या चित्रपटात या जोडीने प्रेक्षकांच्या मनात घर केले. नौ दो ग्यारह, हमसफर, टॅक्सी ड्रायवर और मकान नंबर ४४ या चार चित्रपटांमध्ये कल्पना कार्तिक त्यांच्याबरोबर होत्या.

त्यानंतर वहिदा रेहमान ही त्यांची आवडती नायिका बनली. 'सोलवा साल' या चित्रपटातून या जोडीचा प्रवास सुरू झाला आणि 'है अपना दिल तो आवारा, न जाने किस पे आएगा' असे गुणगुणत पुढे चालू राहिला. 'काला बाजार', रूप की रानी आणि 'गाईड' पर्यंत हा प्रवास सुरू होता. 'गाइड' या चित्रपटाचे कथानक थोडे 'अडव्हान्स' असल्याने दिग्दर्शक विजय आनंद यांनी यातील गीते इतक्या खुबीने चित्रीत केली की, ती आजही गुणगुणली जात आहेत. गुरुदत्त याच्या निधनाने त्यांना धक्का बसला आणि वहिदा यांच्यापासून ते दूर होत गेले.

देवसाहेबांच्या समवेत काम केले नाही, अशी त्याकाळात एकही नायिका नव्हती. 'सीआयडी' चित्रपटात शकिला तर 'राही' आणि 'मुनीमजी' मध्ये नलिनी जयवंतला साथ दिली. 'मुनीमजी' मध्ये देव आनंद यांचा डबल रोल होता. होता. नूतन आणि त्यांची जोडीही दर्शकांना आवडली. सत्तराव्या दशकाच्या कालावधीत दिग्दर्शक म्हणून त्यांचा प्रवास सुरू झाला. या दशकात ज्या अभिनेत्री त्यांच्या सहवासात आल्या त्या त्यांच्या चाहत्या बनल्या. दारासिंग यांच्या पैलवानी आखाड्यातून बाहेर पडून मुमताज जेव्हा देवसाहेबांकडे आली तेव्हा त्या लोकप्रिय झाल्या.

**(साभार : इंटरनेट)**

## आरोग्य प्रहर

# हिरवी मिरची खाण्याचे तोटे! वाचा काय होतात दुष्परिणाम



आपल्यापैकी बहुतेकांना हिरवी मिरची खायला खूप आवडते. जेवणात जर तिखट नसेल तर आपण हिरव्या मिरच्या वेगळ्या मागवून खातो. वडापाव असेल तर सोबत तळलेल्या हिरव्या मिरच्या खातो इतकं त्या हिरव्या मिरचीचं वेड असतं. हिरवी मिरची खाण्याचे फायदे तुम्ही नेहमीच वाचले असतील आज तोटे वाचा.

हिरव्या मिरचीमध्ये कॅप्सॅसिन नावाचे एक कंपाउंड असते. या कॅप्सॅसिन मुळे आतड्यांच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे हिरवी मिरची कितीही खावीशी वाटली तरीही ती प्रमाणात खावी कारण त्याने आतड्याची समस्या होऊ शकते.

रक्तदाब वाढणे: कॅप्सॅसिन ने रक्तदाब वाढू शकतो. हे कंपाउंड उच्च रक्तदाबासाठी कारणीभूत ठरू शकतं. बरेचदा हाय ब्लड प्रेशर म्हणजे उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांना तिखट कमी खा असं सांगितलं जातं. अशा लोकांनी हिरवी मिरची खाऊ नये.

हिरवी मिरची खाल्ल्याने पोटात फॉलिक सिडची पातळी वाढते. मिरची प्रमाणात खाल्ली नाही तर त्याने उष्णता वाढते, पोटात जळजळ होते आणि महत्त्वाचं म्हणजे सिडिटी होते.

काही आजार आहेत ज्यात हिरवी मिरची, तिखट खाऊ नका असं सांगितलं जातं. टीबी या आजारामध्ये हिरवी मिरची न खाण्याचा डॉक्टर सल्ला देतात.

कॅप्सॅसिन या कंपाउंड मुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यातली एक समस्या म्हणजे तोंडात जळजळ होते. कोणतीही गोष्ट अति खाल्ल्याने तिचे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. हिरवी मिरचीदेखील प्रमाणात खावी.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : समुद्रकिनारी नारळ, सुपारीच्या गर्द झाडीत वसलेले मुरुड शहर आकाशातून टिपले आहे सुधीर नाझरे यांनी.**

# कर्जतचे प्लास्टिक कचरामुक्तीकडे पाऊल

## नगर परिषदेच्या रिसायकलिंग प्रकल्पाचे उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात पहिला घनकचरा प्रकल्प राबवणारी कर्जत नगर परिषद कचर्‍याबाबत अधिक सतर्क आहे. त्यामुळेच कर्जत स्वच्छ भारत पर्यटनस्थळावर प्लास्टिक वेस्ट रिसायकलिंग प्रकल्प राबवण्यात आला आहे. सेज कंपनी व नगर परिषद यांच्या माध्यमातून हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते सोमवारी (दि. २५) करण्यात आले आहे.



जगामध्ये कचर्‍याची समस्या मोठी आहे. यामध्ये प्लास्टिक कचर्‍याची संख्या जास्त आहे. कचर्‍यामुळे नागरिकांचे आरोग्यदेखील धोक्यात येते. रस्त्यावर पडणार्‍या कचर्‍यामुळे गुरेदेखील तो खाऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे रोज टनावर निर्माण कचर्‍याची विल्हेवाट कशी लावायची असा प्रश्न आज मोठ्या महानगरांपुढे उभा आहे. अशात सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ला नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी शहरात शून्य कचरा मोहीम राबवून कचरा डेपोवर बगीचा फुलवला. हा वेंगुर्ला पॅटर्नचे देशपातळीवर कौतुक झाले. कोकरे हे वेंगुर्ला येथून कर्जत नगर परिषदेत मुख्याधिकारी म्हणून आले असता त्यांनी नगराध्यक्ष सुवर्ण जोशी व नगरसेवक, नगरसेविकांना सोबत घेऊन येथेही वेंगुर्ला पॅटर्न राबवत कर्जत तालुक्यात पहिला घनकचरा प्रकल्प उभा केला.

प्लास्टिक विघटनशील नसल्यामुळे त्याचा पुनर्वापर करणे गरजेचे आहे. याकरिता कर्जत नगर परिषद हद्दीत प्लास्टिक वेस्ट रिसायकलिंग प्रकल्प उभा केला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन सोमवारी नगराध्यक्ष सुवर्ण जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. कर्जत नगर परिषदेने उभारलेल्या स्वच्छ भारत पर्यटन स्थळी सेज कंपनीला प्लस्टिक वेस्ट रिसायकलिंग प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. या सेज म्हणजेच सस्टेनेबल अप्रोच फॉर ग्रीन इन्व्होर्मेन्ट या कंपनीने कर्जतमध्ये प्लास्टिकवर प्रक्रिया करण्याची विनंती नगर परिषदेला केली होती. त्यानुसार एक करार करीत नगर परिषदेने कंपनीला जागा उपलब्ध करून दिली आहे. शहरातील कचरा वेगळा होऊन येतो त्यामुळे आपोआपच प्लास्टिक वेगळे होऊन येते. त्यामुळे कर्जत डम्पिंग येथे येणारे प्लस्टिक हे सेज कंपनीला देण्यात येणार आहे. त्या प्लस्टिक बदल्यात कंपनी नगर परिषदेला पैसे भरणार आहे.

या प्लस्टिकवर प्रक्रिया करून त्यातून प्लास्टिकचा कच्चा माल बनवून कंपनी विकणार आहे. सेज यासाठी जवळपास ४० लाखांची गुंतवणूक केली असल्याचे कंपनीचे सीईओ आणि मालक अवकाश कुमार यांनी सांगितले आहे. दरम्यान या प्रकल्पामुळे कर्जत नगर परिषदेला आता प्लास्टिक बाहेर विकायला पाठवावे लागणार नाही तर त्यासाठी वाहतुकीचा खर्चदेखील वाचणार आहे.

या वेळी मुख्याधिकारी वैभव गारवे, विरोधी पक्षनेते शरद लाड, नगरसेविका पुष्पा दगडे, वैशाली मोरे, मधुरा चंदन, नगरसेवक विवेक दांडेकर, बळवंत घुमरे, सेज कंपनीचे अवकाश कुमार, स्वच्छता विभागाचे सुदाम म्हसे आदी उपस्थित होते.

# चौक सरपंच रितू ठोंबरे यांना धमकावून पैशांची मागणी

## तिघांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

गावाच्या हद्दीत काम करायचे असेल तर दहा लाख रुपये द्यावे लागतील, अन्यथा काम करू देणार नाही, अशी धमकी चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू सुधीर ठोंबरे यांना स्वप्निल खोपकर, संदेश खोपकर व आशिष अरुण महाडिक (सर्व. रा आसरेवाडी, खालापूर) या तिघांनी दिली असून सरपंच ठोंबरे यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध तक्रार दिली आहे.

रितू ठोंबरे या रविवारी (दि. २४) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्या आसरेवाडी येथे कामाच्या ठिकाणाची पाहणी करून त्यांच्या गाडीमधून चौक हातनोली येथे घरी निघाल्या होत्या. त्याच दरम्यान या तिघांनी आसरेवाडी येथील एका वळणावरील छोट्या पुलाजवळ सरपंच रितू ठोंबरे यांना गाडी थांबविण्यास सांगून काम करायचे असेल तर त्यांना १० लाख रुपये द्यावे लागतील नाहीतर काम करून देणार नाही, अशी धमकी दिली. रितू ठोंबरे यांनी तातडीने खालापूर पोलीस ठाणे गाठत स्वप्निल खोपकर, संदेश खोपकर महाडिक, आशिष अरुण महाडिक यांच्याविरोधात तक्रार दिली आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे भादंविक ३८५, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार बाळा बहाडकर करीत आहेत.

# रेवदंड्याच्या चौल नाक्यावरील खड्डे भरण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**



प्रतिवर्षी ऐन पावसाळ्यात चौल नाक्यावर खड्डे पडून पाण्याची मोठी डबकी तयार झाली आहेत. यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे हे खड्डे लवकरात लवकर भरण्याची मागणी होत आहे.

चौल गाव हे रोहा, मुरूड व अलिबाग या तीन तालुक्याच्या मध्यवर्ती असलेले ठिकाण आहे, परंतु गेले कित्येक वर्ष ऐन पावसाळ्यात चौल नाक्यावर खड्डे पडून त्या ठिकाणी पाण्याची डबकी झाली आहेत. यामुळे वाहनचालकांसह पादचार्‍यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. नाक्यावरील खड्डे पेव्हर ब्लॉक बसवून भरण्याचे काम करण्यात आले, मात्र पेव्हर ब्लॉकही उखडले आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून हे खड्डे लवकरात लवकरात भरून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी होत आहे.

# कोकण पदवीधर मतदारसंघात ३० सप्टेंबरपासून मतदार नोंदणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदारसंघात ३० सप्टेंबरपासून पदवीधर मतदारांची नोंदणी सुरू होणार आहे. संबंधित तहसीलदार कार्यालयात ही मतदार नोंदणी केली जाणार आहे, अशी महिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सोमवारी (दि. २५) पत्रकार परिषदेत दिली. निवडणूक उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे या वेळी उपस्थित होत्या.

१ नोव्हेंबर २०२३ या आर्हता दिनांकावर आधारीत कोकण विभाग पदवीधर मतदार संघासाठी मतदार याद्यांचा पुनरिक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघात मतदार याद्या तयार करण्यासाठी ३० सप्टेंबरपासून मतदार नोंदणी सुरू केली जाणार आहे.

भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी ग्राह्य धरली जाणार आहे. ३० ऑक्टोबर २०२०पूर्वी ज्यांनी पदवी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे, असे पदवीधर मतदारसंघात नाव नोंदणी करण्यास पात्र असतील. मतदार पदवीधर मतदारसंघातील रहिवासी असला पाहिजे. जुन्या पदवीधर मतदार यादीत नाव असले तरी ते ग्राह्य धरले जाणार नाही. नव्याने नाव नोंदणी करणे आवश्यक आहे, अशी माहिती डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

# पोलिसांच्या नियोजनामुळे मुरूड शहराला कोंडीपासून दिलासा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील अरूंद रस्ते व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर होणारी गर्दी लक्षात घेत वाहतूक पोलिसांनी वेळीच योग्य नियोजन केल्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळाला आहे.

मुरूड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी शहरात बिघडलेली वाहतूक व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी एक दिशा मार्ग अवलंबून त्या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आल्याने वाहनचालकांना मोठा चाप बसला. त्यामुळे शहरातील मुख्य बाजारपेठेत कुठेही वाहतूक कोंडी झाली नाही.

मुरूड शहरासह पंचक्रोशी भागातील नागरिकांना मुरुड ही मुख्य बाजारपेठ असल्याने या ठिकाणी खरेदी व विक्रीसाठी रोज शेकडो वाहनचालक व नागरिक ये-जा करित असतात. काही बेशिस्त चालक रस्त्यावर वाहने उभी करीत असल्याने रहदारीला अडथळा निर्माण करतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन नागरिक हैराण झाले होते. पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी शहरातील मुख्य बाजारपेठेत एक दिशा मार्ग केल्याने वाहतूक कोंडी कमी झालेली दिसून आली, परंतु हा एक दिशा मार्ग पोलिसांनी तात्पुरता न ठेवता तो कायम स्वरुपी ठेवावा जेणेकरून याठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही असे शहरातील नागरिक हितेंद्र पंड्या यांनी केले.




## नावात बदल

माझे जुने नाव **श्री. अमर किशोरलाल देवडा,** राहणार फ्लॅट नं.०१, ओम साई धाम सोसायटी, प्लॉट नं. २४३, भाजी मार्केट, पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र) हे माझे नाव असून, अमर किशोरी देवडा असे नजरचुकीने झाले आहे. माझे खरे बरोबरचे नाव **श्री. अमर किशोरलाल देवडा** असून वरील दोन्ही एकच व्यक्ती आहे.

याबाबत मी **नोटरी केली आहे नं.** 64 AA 609237 **दिनांक २५/९/२०२३** रोजी बदलले असून, यापुढे मी **श्री. अमर किशोरलाल देवडा** या नवीन नावाने ओळखला जाईल.

**सही/-**
**श्री. अमर किशोरलाल देवडा**
नवीन नाव


# आदिवासी बांधवांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा -शशिकला अहिरराव

**पेण : प्रतिनिधी**

आदिवासी समाजातील बांधवांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी पेण येथे केले.



आदिवासी आदिम कातकरी संघटना महाराष्ट्र राज्य व समस्त आदिवासी कातकरी समाज पेण यांच्या संयुक्त विद्यमाने चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९३वा वर्धापनदिन व क्रांतीवीर हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांचा स्मृतीदिन सोमवारी (दि. २५) पेण कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी शेरमकर, आदिवासी आदिम कातकरी संघटना राज्य अध्यक्ष विश्वास वाघ, नायब तहसीलदार सुरेश थळे, महाड मंडळ अधिकारी अनंत वाघमारे, शांताराम पवार, प्रिती फाउंडेशन अध्यक्ष रणजित पवार, लक्ष्मण निरगुडा, रामलाल जयस्वाल, कार्यकारिणी सदस्य अंकुश वाघमारे, महेश पवार, रोडे सरपंच दिनेश पवार, नारायण वाघमारे आदींसह समाजातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

पुढे बोलताना शशिकला अहिरराव यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील २४ आश्रमशाळेमध्ये कातकरी समाजातील ९४६ मुले शिकत आहेत. त्यामुळे अधिकाधिक नोंदणी करून घेणे गरजेचे आहे. शासनाच्या योजनेमध्ये आदिवासी गरोदर महिलेला सुरुवातीपासून ते मुलाच्या पुर्ण शिक्षणापर्यंतचा खर्च शासन करीत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी समाजातील कार्यकर्त्यांनी प्रयत्नशिल रहावे. आपल्या पेण तालुक्यातील दोन विद्यार्थी हे एमपीएससी आणि यूपीएससी या परीक्षांची पूर्वतयारी करीत आहेत ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी आदिवासी समाजातील दहावी, बारावी व उच्च शिक्षण घेत असलेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# पोलादपूर अंडरपास महामार्गावर गुरांमुळे अपघात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरात रविवारी (दि. २४) रात्री अंडरपास महामार्गामध्ये गुरांमुळे अपघात होऊन त्यामध्ये एका गायीचा मृत्यू झाला, तर अन्य दोन गायी जखमी झाल्यची घटना घडली.

मुंबईकडून रिकामी मिनीबस (एमएच१२ आरएन१६७९) घेऊन जाणार्‍या चालकाला अंधारात बसलेली गुरे दिसली नाहीत आणि भरधाव मिनीबस या गुरांना धडकली. यामुळे अर्धा तास कोकणात जाणार्‍या लेनवरील वाहतूक ठप्प झाली. तीन गायी जबर जखमी झाल्या. दोन गायी मिनीबसखाली अडकल्या. त्यांना परिसरातील लोकांनी बाहेर काढले, मात्र त्यातील एका गायीचा मृत्यू झाला.

# खालापूर येथे जंगल सत्याग्रह दिनानिमित्त कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या विकासात्मक, शैक्षणिक व नागरी सुविधा पुरविण्यास खालापूर प्रशासन नेहमीच अग्रेसर राहील. आपण शैक्षणिक कार्यासाठी एकत्र काम करून समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक ते प्रयत्न करू, असे आश्वासन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी दिले.




उरण तालुक्यातील चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी जंगल सत्याग्रह झाला होता. आदिवासी शेतकरी, आगरी, कोळी, कातकरी, या कष्टकरी जनतेवर इंग्रजांनी स्वतः ची शेती करणे, जंगल तोडणे यावर बंदी घातली होती. त्याविरोधात काठ्या, कोयते, कुर्‍हाड, विळा अशी अवजारे घेऊन ब्रिटिशांचा कायदा मोडीत काढला होता. या वेळी इंग्रजांनी केलेल्या गोळीबारात महादू कातकरी हे शहीद झाले होते. त्यांची आठवण म्हणून आजही आदिवासी बांधव चिरनेर सत्याग्रह दिन म्हणून साजरा करतात.

धाकु फोफेरकर, रघुनाथ न्हावी, रामा कोळी, परशुराम पाटील, हसुराम घरत, अळू म्हात्रे, याही वीर पुरुषांना आपला जीव गमवावा लागला. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार आयुब तांबोळी बोलत होते.

कार्यक्रमास खालापूर तालुक्यातील अनेक आदिवासीं महिला, भगिनी व पुरूष उपस्थित होते. या वेळी तहसीलदार आयुब तांबोळी यांचा सन्मान करण्यात आला.


## जाहीर सूचना

मा. भारत निवडणूक आयोगाकडील निर्देशानुसार दि. २२.०८.२०२३ ते २९.०९.२०२३ या कालावधीत मतदान केंद्रांचे सुसूत्रिकरण व पुर्नरचना करण्यांत येत आहे. रायगड जिल्हयातील एकूण ७ विधानसभा मतदार संघाचे एकत्रितरित्या मतदान केंद्राच्या नावातील बदल, मतदान केंद्रांच्या स्थानातील बदल, अंतरामुळे नविन निर्माण झालेले मतदान केंद्र, Merge करण्यांत आलेले मतदान केंद्र व एका मतदान केंद्रावरील १५०० मतदारांपेक्षा अधिक क्षमता होणार्‍या मतदान केंद्राच्या बाबतीत नव्याने प्रस्तावित होणार्‍या मतदान केंद्राच्या सुसूत्रिकरणाचे व पुर्नरचनेचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावित बदल हे सर्व विधानसभा मतदार संघाच्या पदनिर्देशित अधिकारी यांचे आदेश क्र. निवडणूक / कार्या ६(२)/म.के.सू./प.नि.अ/२०२३ दिनांक ०१ सप्टेंबर, २०२३ रोजी या कार्यालयाकडून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयास मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्या करिता प्राप्त झाले आहेत. तरी सदर बदल व अस्तित्त्वात असलेल्या मतदान केंद्रांची प्रारूप यादी मतदान केंद्र मॅनुअल, २०२० जोडपत्र । मध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांच्या कार्यालयाच्या नोटीसबोर्ड वर दि. २६/०९/२०२३ रोजी जाहिर रित्या प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. तसेच https://raigad.nic.in या बेवसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर बाबत काही सूचना व हरकती दयावयाची असल्यास पुढील ७ दिवसात या कार्यालयात लेखी सूचना देऊ शकतात. वरील नमूद मतदान केंद्र सुसूत्रिकरण व प्रमाणिकरण प्रस्ताव मा. भारत निवडणूक आयोगाकडून मंजूर झाल्यास सदर एकत्रितरित्या प्रसिध्द होणार्‍या प्रारुप मतदान केंद्रांच्या यादीमध्ये सदरचे बदल अंमलात येतील व त्या आधारे मतदान केंद्राचे सुसूत्रिकरण व पुर्नरचना देखील अस्तित्त्वात येईल. सदरची जाहीर नोटीस दिनांक २६/९/२०२३ रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयात जाहिररित्या प्रसिध्द करण्यांत येत आहे.

**सही/-**
**(डॉ. योगेश म्हसे)**
जिल्हाधिकारी व
जिल्हा निवडणूक अधिकारी
रायगड-अलिबाग

# नवी मुंबई मनपाच्या स्वच्छतेचा गौरव

## तीन बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स

**नवी मुंबई : बातमीदार**

'इंडियन स्वच्छता लीग २'मध्ये सहभागी होताना नवीन उच्चांक प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून सहभागी झालेल्या नवी मुंबई महापालिकेने लीग अंतर्गत आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छताविषयक अभिनव उपक्रमांचे आयोजन केले होते.

या उपक्रमांची विशेष दखल राष्ट्रीय पातळीवर 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने घेण्यात आलीच, शिवाय 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' या राष्ट्रीय पातळीवर आगळ्यावेगळ्या विक्रमांची नोंद घेणाऱ्या संस्थेमार्फतही यांची विशेष दखल घेत 'इंडियन स्वच्छता लीग'मधील नवी मुंबई महापालिकेच्या तीन वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांना ३ 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स'ने गौरविण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय विक्रमांची नोंद असलेली ही तिन्ही 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स'ची विक्रमी प्रमाणपत्रे बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्सचे भारतातील परीक्षक आंतरराष्ट्रीय क्रीडापटू बी.बी. नायक यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना प्रदान केली. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, अति. शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण' अंतर्गत 'इंडियन स्वच्छता लीग २'मध्ये 'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येयवाक्य नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महापालिकेचा 'नवी मुंबई इको नाईट्स' हा संघ सहभागी झाला आहे. या संघाचे कर्णधारपद सुप्रसिध्द संगीतकार, गायक तसेच स्वच्छ नवी मुंबई मिशनचे ब्रँड म्बेसेडर पद्मश्री शंकर महादेवन हे भूषवित आहेत. या अंतर्गत शहरात स्वच्छताविषयक विविध उपक्रमांचे आयोजन करीत त्यामध्ये यूथवर्सेसगार्बेज या हॅशटॅगच्या अनुषंगाने कचऱ्याविरोधातील युवकांच्या लढाई नजरेसमोर ठेवून युवक सहभागावर विशेष भर देण्यात आला.



या अनुषंगाने शासन निर्देशानुसार १७ सप्टेंबर रोजी भव्यतम उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरात आठही विभाग कार्यालयांच्या क्षेत्रातील मुख्य नऊ ठिकाणी एकाच वेळी सकाळी ८ वाजता आयोजित केलेल्या सामुहिक शपथ उपक्रमात १.१४ लक्ष इतक्या मोठ्या संख्येने स्वच्छताप्रेमी विद्यार्थी आणि नागरिकांनी विक्रमी संख्येने सहभागी होत एकात्मतेचे व स्वच्छतेविषयीच्या जागरूकतेचे दर्शन घडविले. पाच ठिकाणी खाडीकिनारी राबविण्यात आलेल्या खारफुटी स्वच्छता मोहीमेत १०,५०० हून अधिक नागरिक स्वयंस्फुतीने सहभागी झाले. त्यातही युवकांची व विशेषत्वाने युवतींची संख्या लक्षणीय होती. याशिवाय लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या पुढाकाराने २३५ तृतीयपंथी नागरिकांनी एकत्र येत स्वच्छतेविषयी अभिनव पध्दतीने जनजागृती केली.

या वैशिष्ट्यपूर्ण अशा भव्यतम उपक्रमाची विशेष नोंद घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स यांच्या वतीने रेकॉर्ड्सचे विक्रमी प्रमाणपत्र परीक्षक बी. बी. नायक यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांचेकडे प्रदान केले.अशाप्रकारे आणखी दोन विक्रम नोंदीत झाले असून यामधील एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे सध्याच्या माहिती व तंत्रज्ञान युगाला साजेसा 'स्वच्छतेची डिजीटल शपथ' हा उपक्रम. या अंतर्गत नवी मुंबईचे आकर्षण केंद्र असलेल्या वंडर्स पार्क या ठिकाणी एका दिवसात २६ हजार १३३ नागरिकांनी स्वच्छतेची डिजीटल शपथ घेत स्वच्छ शहराविषयी असलेली आपली बांधिलकी प्रदर्शित केली. या सर्वाधिक डिजीटल शपथ उपक्रमाचीही विक्रमी नोंद 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स'ने घेतली. याशिवाय 'इंडियन स्वच्छता लीग २' अंतर्गत १५ सप्टेंबरला महापालिका क्षेत्रातील खाजगी व महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या मनातील स्वच्छतेच्या संकल्पनांना चित्ररूप देण्यासाठी आयोजित केलेल्या स्वच्छ चित्रकला स्पर्धेत ४३१ शाळांतील एक लाख ८३ हजार १४४ विद्यार्थ्यांनी सहभागी होत 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स'मध्ये नोंद होईल असा विक्रम प्रस्थापित केला. त्याच्या रेकॉर्ड्सचे प्रमाणपत्र यापूर्वीच महापालिकेकडे सुपूर्द करण्यात आले होते.

### विक्रम नवी मुंबईकर नागरिकांना समर्पित

'इंडियन स्वच्छता लीग २.०' अंतर्गत नवी मुंबई महापालिकेने '३ बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' प्रस्थापित केले असून हे तिन्ही विक्रम नवी मुंबईकर नागरिकांच्या स्वच्छताप्रेमाचे व एकात्म भावनेचे प्रचिती देणारे असून हे तिन्ही विक्रम नवी मुंबईकर नागरिकांना समर्पित असल्याची भावना आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विक्रमाची प्रमाणपत्रे स्विकारताना व्यक्त केली.

# पनवेल परिसरातील गरजू मुलांना शैक्षणिक आधार

## कोलते दाम्पत्याने आणले प्रवाहात



**पनवेल : वार्ताहर**

अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांकरिता भटकंती करणाऱ्या कुटुंबातील ५७ मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळवून देण्याचे मोठे काम कोलते दांपत्याने केले आहे. अर्थात रायगड जिल्हा व पनवेल तालुका शिक्षण विभागाकडून यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यानुसार अंगणवाडी आणि रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये हे मुलं-मुली ज्ञानाचे धडे गिरवत आहेत. अज्ञानाच्या अंधारात ज्ञानाचा उजेड पडल्याचा प्रत्यय या निमित्ताने सर्वांनाच आला.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला शिक्षण मिळालेच पाहिजे. तो त्यांचा मूलभूत हक्क आणि अधिकार आहे. मात्र गरिबी ही पाटी पेन्सिलच्या आड येते. दोन वेळच्या अन्नासाठी भटकंती करणाऱ्या कुटुंबाच्या आरोग्य आणि शिक्षण कोसो मैल दूर राहते. कळंबोली उड्डाणपुलाखाली या स्थितीतील अनेक कुटुंब भाकरीत चंद्र शोधतात. देशाचे हे भवितव्य आणि उद्याचे नागरिक निरक्षर राहू नये या उद्देशाने अनिता कोलते आणि त्यांचे पती डॉ. योगेंद्र कोलते यांनी स्वामी विवेकानंद मानवसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून कळंबोली उड्डाणपुलाखाली बिनभिंतीची शाळा सुरू केलेली या ठिकाणी या मुलांना लिहिण्या वाचण्यास शिकवले जाते. त्याचबरोबर त्यांचे भविष्य उज्वल करण्याच्या अनुषंगाने ही कोलते दांपत्य प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहेत. शेकडो शाळाबाह्य विद्यार्थ्यांना त्यांनी साक्षर केले आहे.

या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांच्या सहकार्याने जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये यापैकी काही मुलांना या शैक्षणिक वर्षांमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. आसूड गाव जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये २७ मुलं दाखल करण्यात आले आहेत. तर अंगणवाडीतही कळंबोली उड्डाणपुलाखालील ३० मुलं-मुली जाऊ लागल्या आहेत. इतर विद्यार्थ्यांमध्ये आता ते मिसळू लागले आहेत. त्याचबरोबर चांगला अभ्यासही करीत आहेत. त्यांचे शैक्षणिक भवितव्य यामुळे उज्वल होणार आहे.

# उरणमध्ये पंडित दिनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त अभिवादन



**उरण : वार्ताहर**

पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त आमदार महेश बालदी यांच्या जनसंपर्क कार्यालयात सोमवारी (दि. २५) अभिवादन करण्यात आले. या वेळी पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, रायगड जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष जसिम गॅस, सुरज ठवले व भाजप कार्यकर्ते आदींनी पंडित दिनदयाळ यांना अभिवादन केले.



**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते कृपेश कांडपिळे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते संजय भगत उपस्थित होते.** (छाया : विकास म्हात्रे)

## तुर्भे येथील विद्युत समस्या सोडविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे येथील वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठयाची समस्या सोडवण्याची मागणी माजी नगरसेविका शशिकला पाटील यांनी महावितरणचे अधिक्षक अभियंता यांच्याकडे केली आहे.

तुर्भे येथील सेक्टर -२१, २३ व २४ तुर्भे येथील नागरिक विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने त्रस्त झाले आहेत. विजेच्या वाढत्या मागणीनुसार त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा. ना दुरुस्त व मोडकळीस आलेल्या डी. पी बॉक्स, पिलर, पोल, जीर्ण झालेल्या विद्युत वाहिन्या नव्याने टाकण्यात याव्यात. तसेच उघड्यावरील वीज वाहिन्या भूमिगत करून रहिवाशांना दिलासा द्यावा.

या कामाकरिता निधीची आवश्यकता लागल्यास आपण शासनाकडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून देऊ, असे शशिकला पाटील दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# रसायनीत ऑनलाईन मनी ट्रान्स्फरमधून फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलिस ठाण्याजवळच सिध्देश्वरी वळणावर वचनपुत्र इंटरप्रायझेस (तत्काळ मनी ट्रान्स्फर) यांचा दुकानात फिर्यादी अनीष राव गौतम (वय २१) याने वडिलांच्या खात्यावर ऑनलाईन ट्रान्स्फरकरीता आरोपी नंदलाल आनंद झिंझोरे यांना विश्वासाने दिलेले १५ हजार रुपयांपैकी फक्त पाच हजार रुपये ऑनलाईंन ट्रान्स्फर करुन उर्वरित १० हजार रुपयांचा मनी ट्रान्स्फर न करता आरोपी रुपेश रामजी मिश्रा आणि नंदलाल आनंद झिंझोरे यांनी स्वःताच्या फायद्यासाठी फसवणूक केली.

अशाच प्रकारे विनोद गुर्जर -७०००, वृशाली -७५००,अनिल पाल १५०००,अनिस -१५०००, लालची देवी -५०००, पुलमती -१०,०००, जानकी कुंजम-१००००, संतोष -१००००, रतेश -१५००, सोनी कुमारी- १००००, महंमद इर्शाद -१००००, सुनील पाल -५०००,अंजू




देवी -१५०००,रमानंद कुमार -१५००, राजू ड्रायव्हर -४०००, दाजू चायनीजवाला -९००० आदीची फसवणूक केली आहे.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात भा. दं. वि. कलम ४२०, ४०६ आणि ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार मपोना म्हात्रे,मपोना शेळके अधिक तपास करीत आहेत.

# आदिवासी विद्यार्थ्यांना साहित्यवाटप

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषदेचे विद्यमान सदस्य विजय भोईर आणि ब्लू स्टार सिक्युरिटी आणि फॅसिलिटीचे मालक विकास भोईर या जुळ्या बंधूंच्या जन्मदिनानिमित्ताने चिरनेर येथील अक्कादेवी आदिवासी वाडीतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या विजय विकास सामाजिक मंडळाची निर्मिती या बंधूंनी केली असून या मंडळामार्फत अनेक विकासाची कामे तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी या मंडळाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

या वेळी अमित ठाकूर, अमित मुंबईकर, प्रवीण ठाकूर, प्रितम ठाकूर, पराग ठाकूर,आणि मित्र परिवार उपस्थित होता.



दरम्यान, विजय भोईर आणि विकास भोईर यांना चिरनेर येथील त्यांच्या मित्र परिवारातर्फे वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

# घणसोलीतील शिवसाई मंडळातर्फे स्वच्छताकर्मींना आरतीचा मान

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोलीचा महाराजा म्हणून नावाजल्या जाणाऱ्या घणसोलीतील श्री शिवसाई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने श्रीगणेशोत्सवातील आरतीचा मान मंडळाचे पदाधिकारी, मान्यवर लोकप्रतिनिधी अथवा विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते करण्याच्या या परंपरेला छेद देत गणेशोत्सवातील श्रींच्या आरतीचा बहुमान नवी मुंबई महापालिकेच्या स्वच्छताकर्मींना दिली.



स्वच्छता ही नवी मुंबईची ओळख असून नवी मुंबई महापालिकेने राष्ट्रीय पातळीवर स्वतःचे मानांकन कायम उंचावत ठेवले आहे. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका स्वच्छताकर्मी सेवाभावी वृत्तीने दररोज करीत असलेल्या कामाचा सर्वात महत्त्वाचा वाटा असून दिवसरात्र तिन्ही ऋतूंमध्ये हे स्वच्छताकर्मी शहर स्वच्छतेची आपली जबाबदारी अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत असतात. त्यांच्या या समर्पित भावनेने केलेल्या कामामुळेच नवी मुंबई महानगरपालिका स्वच्छतेमध्ये नेहमीच आघाडीवर राहिली आहे.

या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करीत व त्यांच्या कामाबद्दल एक प्रकारची कृतज्ञता प्रदर्शित करीत घणसोली येथील शिवसाई गणेशोत्सव मंडळांने त्यांना आरतीचा बहुमान देऊन त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव तर केलाच शिवाय श्रमप्रतिष्ठेचे मूल्य अधिक उंचावले आहे. या कृतीबद्दल शिवसाई गणेशोत्सव मंडळ घणसोली यांची सर्व स्तरातून प्रशंसा करण्यात येत आहे.

## कर्मवीर सप्ताहानिमित्त कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि.२२) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३६व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन व भित्तीपत्रकांचे अनावरण करण्यात आले.

कर्मवीरांच्या जीवन चरित्रावरील भित्तिपत्रके प्रा.आर.एफ.इनामदार मॅडम यांनी विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतले. कर्मवीर सप्ताहानिमित्त टिचर ट्रेनिंग वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले. डॉ. राहुल पाटील यांनी इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण कसे देता येईल याविषयी माहिती दिली. गुगल क्लास रूम, गुगल मिट, ऑनलाईन परीक्षा, अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहचवता येऊ शकते याविषयी शिक्षकांना प्रशिक्षण दिले. प्रा. बळीराम पवार यांनी झशवशेसेसू म्हणजे काय तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाईन कसे शिकवावे, शिक्षकाने कशा पद्धतीने घटकाची तयारी करून यायला हवी.

ॲक्टिव्ह लर्निंग म्हणजे काय याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार, उपप्राचार्य, डॉ. विलास महाले, कर्मवीर सप्ताहाचे चेअरमन प्रा.दिलीप केंगार, आयक्यएसीचे कॉर्डिनेटर डॉ.राहूल पाटील व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सेवकांनी कर्मवीर प्रतिमा पूजन केले. प्रास्ताविक प्रा. दिलीप केंगार यांनी केले, प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी आभार मानले. डॉ. सुजाता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकविरा युवक मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्या अंतर्गत यंदाच्या वर्षी तक्का येथील मराठी शाळेतील पहिले ते सातवीमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक, उर्दू शाळेतील हहिली यते चौथी, दर दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर परीक्षांमध्ये उतीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि. २४) झाला.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचाली करीता सदीच्छा देण्यात आल्या. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सनदी लेखापाल जे. डी. तांडेल, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, संदीप बहिरा, सागर बहिरा, प्रतिक बहिरा, मनोहर मुंबईकर, संदीप खुटकर, संजय बहीरा, ॲड. दत्तात्रेय शिंदे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### ‘सन्मित्र’च्या स्मरणिकेचे प्रकाशन

**नागोठणे** : सन्मित्र गणेशोत्सव मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी आठवणींना उजाळा देणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन नुकतेच



मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्मरणिका प्रकाशन सोहळ्यात राजिपचे माजी सदस्य किशोर जैन, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, हरीशशेठ काळे, भाएसोच्या उपाध्यक्ष संगिता जैन, भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी सोनाली कदम, नागोठण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक संदीप पोमन, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, धनंजय जगताप, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कांबळे, भाजपच्या महिला नेत्या प्रियांका पिंपळे, मुग्धा गडकरी, सुखदा वढावकर, मंडळाचे कार्याध्यक्ष उदय भिसे, मुख्य विश्वस्त किर्तीकुमार कळस, उपाध्यक्ष रुपेश पिंपळे, सचिव धनाजी डबके, सहसचिव संदेश सुकाळे, खजिनदार राजेंद्र गुरव पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

### दीपक मोकल यांना पुरस्कार

**रेवदंडा** : रेवदंड्यातील कोएसो माजी मुख्याध्यापक व



क्रीडा शिक्षक दीपक मोकल यांना नुकतेच प्राईड ऑफ इंडिया अवार्डने सन्मानित करण्यात आले. कलासाधना सोशल आरॅगनॉयझेशनच्या वतीने नवी मुंबई येथे अभिनेत्री नयन पवार, झी टीव्ही वाहिनीचे संदिप देसाई, विनोदाचे बादशाह जॉनी रावत यांचे उपस्थितीत प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. दिपक मोकल यांचे आमदार महेंद्र दळवी व कोकण शिक्षक मतदार संघ शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अभिनंदन केले.




**माणगाव : राष्ट्रीय नेते स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे.** (छाया : सलीम शेख)

# खोपोलीतील सांस्कृतिक वारसा धुळीत

## ■ शाहू महाराज सामाजिक सभागृहाची दारे तीन वर्षांपासून बंदच

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

सात वर्षांपूर्वी १६ कोटींचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह व नाट्यगृहसंकुलाची स्थिती भयानक बनली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष व खासदार शरद पवार यांच्या हस्ते या सभागृहाचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले होते, मात्र गेल्या तीन वर्षांत या ठिकाणी एकही नाटक अथवा कार्यक्रम झालेला नाही. त्याचप्रमाणे नाट्यगृहाची दूरवस्था झाली आहे. त्यामुळे नाट्यप्रेमींमध्ये नाराजी पसरली आहे.

शहरातील सर्वांत आकर्षक इमारत व कला, संस्कृतीचे केंद्र असलेले हे सभागृह प्रशासकीय उदासीनतेचे बळी ठरले असून, वर्तमान स्थितीत अखेरची घंटा मोजत आहे. या सभागृहाची डागडुजी व दुरुस्तीसाठी जवळपास तीन कोटी निधींची आवश्यकता असून, यातील दोन कोटी निधीला मंजुरी मिळाली असल्याचे पालिकेकडून सांगण्यात येत आहे.



(छाया : जयवंत माडपे)

दुसरीकडे या सभागृहावर दर दोन वर्षांनी दुरुस्तीच्या नावाने वारंवार निधी खर्च होत असून पालिकेकडून नियोजन होत नसल्याचा आरोप राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नाट्यप्रेमींकडून केला जात आहे. नवीन निधी खर्च करण्यापूर्वी धोरणात्मक निर्णय व ठोस उपाययोजना होण्याची मागणी केली जात आहे.

उद्घाटन झाल्यावर फक्त अडीच वर्षच येथे नाट्यप्रयोग व अन्य कार्यक्रम झाले. मागील साडेतीन वर्षांपासून हे नाट्यगृह पूर्णपणे बंद आहे. नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रे, पंखे, आधुनिक यंत्र समुग्री गायब झाली असून ही समुग्री चोरी झाल्याची तक्रार पालिकेकडून देण्यात आली, मात्र नंतर याबाबत काहीही घडले नाही. सुरुवातीचे १६ कोटी, दोन वर्षांनी दीड कोटी, कोरोनानंतर पुन्हा काही लाख व आता पुन्हा दोन ते तीन कोटी निधी खर्च प्रस्तावित आहे.

**नाट्यगृह पुन्हा सुस्थितीत आणण्यासाठी डागडुजी व दुरुस्ती आवश्यक आहे. त्या संबंधित अहवाल तयार करण्यात आला असून अपेक्षित खर्चासाठी पाठपुरावा केला जात आहे. यातील काही निधी मंजूर करण्यात आला आहे. निविदा व तांत्रिक प्रक्रिया पूर्णत्वास आल्यावर तातडीने कामाला सुरुवात होईल.**
**–अनुप दुरे–पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

**सुरुवातीचे १६ कोटी तसेच वेगवेगळ्या प्रकारची दुरुस्ती, डागडुजीसाठी अतिरिक्त दोन कोटींच्यावर निधी पालिकेकडून खर्च होऊनही या सभागृहाची अवस्था पूर्वीपेक्षा भयानक बनली आहे. नाट्यगृहात कार्यक्रम होण्यासाठी पालिका प्रशासनाने धोरणात्मक नियोजन करण्याची गरज आहे, मात्र प्रशासनाचे उदासिनता प्रकर्षाने जाणवत असल्याचे दिसून येत आहे.**
**–अनिल वाघमारे, माहिती अधिकार कार्यकर्ते, खोपोली**

**छत्रपती शाहू महाराज सभागृह शहराचे सांस्कृतिक व कलेचे वैभव आहे. नाट्यप्रेमी व नाट्यप्रयोग आयोजकांचे मत ऐकले असते व त्या त्या वेळी दुरुस्ती व देखभाल झाली असती, तर आताची भयानक स्थिती निर्माण झाली नसती हे नाट्यगृह वारंवार निधी खर्च करण्यासाठीचे केंद्र बनले असूनही येथील दुरवस्था मात्र कमी होण्याऐवजी वाढत आहे याचा शोध लावण्याची गरज आहे.**
**–प्रशांत कुलकर्णी, नाट्यप्रेमी, खोपोली**

# श्रीवर्धन पालिका प्रशासनाचा अजब प्रकार

## खड्डे भरण्यासाठी वापरली खडी; मिरवणुकांना अडथळा

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषदेने या वर्षी खड्डे भरण्यासाठी पावसाळी वापरण्यात येणाऱ्या डांबराचा वापर न करता खड्ड्यांमध्ये फक्त खडी भरून त्यावर रोलर फिरवला होता, परंतु पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाच्या वेळी सकाळी भरलेले खड्डे दुपारी पडलेल्या जोरदार पावसामुळे उखडले. त्यामुळे गणेशभक्तांना गणेश मिरवणुका खडबडीत रस्त्यावरूनच न्याव्या लागल्या.



नगर परिषदेच्या शाळा क्र.१ समोर व उपजिल्हा रुग्णालयासमोर खड्डे भरण्यासाठी फक्त खडीचा वापर केल्याने संपूर्ण खडी रस्त्यावर अस्ताव्यस्त पडली आहे. यावरून दुचाकी स्वार देखील घसरण्याच्या घटना घडल्या आहेत. वास्तविक पाहता गणपती सणाच्या अगोदरच नगर परिषदेने पावसाळ्यात वापरण्यात येणारे केमिकल डांबर वापरून खड्डे भरणे अपेक्षित होते.

काही ठिकाणचे खड्डे नगर परिषदेने समुद्रकिनाऱ्यावर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून भरून घेतले होते, परंतु भरलेले खड्डे पूर्णपणे पुन्हा उखडून गेले. नगर परिषदेने रस्त्यावर पडलेली खडी तातडीने उचलून घ्यावी जेणेकरून अपघात होणे टाळले जाईल, तसेच दहा दिवसांच्या गणपती विसर्जना अगोदर केमिकल डांबराने खड्डे भरण्यात यावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# माणगावमध्ये दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू; चालक जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

दुचाकी अपघातात पाठीमागे बसलेल्या एकाचा मृत्यू झाला असून चालक आरोपी जखमी झाला आहे. हा अपघात रविवारी (दि. २४) तालुक्यातील निजामपूर ते भाले गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर काळ नदी पुलाच्या मागील वळणावरील रस्त्यावर घडला. या अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद गणेश रघुनाथ मोरे (वय ४५, रा. भाले) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आरोपी गोपीनाथ गणपत मोरे (वय ३७, रा. भाले) याने त्याच्या ताब्यातील ॲक्टिवा स्कुटीवरून (एमएच ०६सीएफ ८८८६) राजाराम शंकर मोरे (वय ५२, रा. भाले) यांच्यासह जात असताना अतिवेगाने गाडी चालवून अपघात केला. या अपघातात राजाराम शंकर मोरे यांच्या डोक्याला दुखापत होऊन यांचा मृत्यू होऊन दुचाकीचे नुकसान झाले.

याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तुणतुणे हे करीत आहेत.



**खोपोली : भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना युवा मोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, भाजप शहर उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, पदाधिकारी करण यादव, सिद्धेश पाटील व इतर कार्यकर्ते.** (छाया : जयवंत माडपे)

# मोरे महिला महाविद्यालयात एनएसएस वर्धापन दिन उत्साहात



**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाचा वर्धापन प्रतिवर्षी २४ सप्टेंबर या दिवशी साजरा केला जातो. याच दिवशी एम. बी. मोरे कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय,धाटाव–रोहा येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभाग कार्यरत असून त्यात नोंदणीकृत १०० विद्यार्थिनी (स्वयंसेविका) आणि एक प्राध्यापक (कार्यक्रम अधिकारी) यांच्याकडून वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

महिला महाविद्यालयात रासेयो वर्धापन दिनी संस्थेचे अध्यक्ष विजयराव मोरे यांच्या हस्ते एनएसएस ध्वजरोहण करण्यात आले, तसेच स्वयंसेविकांनी राष्ट्रगीत, विद्यापीठ गीत आणि एनएसएस गीताचे गायन करून एनएसएस ध्वजास मानवंदना दिली. उपस्थितांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर पाखर, प्रा. अक्षता ठाकूर, महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी आणि एनएनएसच्या स्वयंसेविका या कार्यक्रमात सहभागी होते.



**खोपोली : रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी कर्जत पोसरी येथे आमदार महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी विराजमान श्री गणरायाचे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत पंचायत समिती माजी सभापती मनोहर थोरवे यांनी केले. या वेळी प्रसाद थोरवे, कर्जत नगरसेवक संकेत भासे, दिनेश थोरवे व इतर मान्यवर उपस्थित होते.**

# कोयना प्रकल्पग्रस्त जांबरुंग गावचा एकोपा

## पुनर्वसनानंतरही गणेशोत्सवाची परंपरा कायम





**चौक : प्रतिनिधी**

कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात असलेल्या गावांचे पुनर्वसन झाल्यावरदेखील गौरी गणपतीची परंपरा कायम आहे. त्यामुळे गावचा आणखी एकोपा टिकून राहिला आहे.

कोयना धरणाच्या निर्मितीमुळे आपले घरदार, शेती सोडून आलेले जांबरुंग गाव खालापूर तालुक्यात वावंढळ येथे वसले आहे. कोयना धरणाच्या निर्मितीमुळे तेथील अनेक गावांचे पुनर्वसन ठाणे, रायगड, पालघर, सातारा, रत्नागिरी, सोलापूर या ठिकाणी झाले. राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर या गावचे भाग्यविधाते कै. जयसिंगराव तथा जे. आर. कदम यांनी सुंदर वसाहतीची निर्मिती केली आहे. सातारा जिल्ह्यातील जांबरुंग या ठिकाणी असतानाच शेकडो वर्षांपासून सुरू असलेली परंपरा आजही कायम आहे.

गौरीपूजनाच्या दिवशी ग्रामस्थ मंदिरातून देवीचे दास्तान घेऊन त्यातील एक देवी जानाई ही मानकरी कै. अनंतराव कदम यांच्या घरी तर दुसरे ग्रामदैवत आई इंजाई ही कै. जे. आर. कदम यांच्या घरी आणायचे. आजही वावंढळ या ठिकाणी ही परंपरा सुरू असून त्यांच्या वारसांच्या घरी आणली जाते. आई जानाई ही गौरी गणपती जवळ बसते, तर इंजाई ही घरच्या कुलस्वामिनी सोबत देव्हाऱ्यात दक्षिणाभिमुख विराजमान होते. हीदेखील परंपरा कायम आहे. या दोन्ही ठिकाणी ओवसा झाल्यावर गावांतील गौरी गणपतीचा ओवासा होतो. नववधू प्रथम या ठिकाणी ओवसा पूजनासाठी येथे येतात.

अनेक जण आपल्या इच्छितसाठी नवस बोलतात, तर फेडण्यासाठीही भाविक येतात. होळी आणि नवरात्र यावेळी दास्तानरुपी देवींचे दर्शन होते. त्यामुळे अनेकजण दर्शन घेण्यासाठी येतात. पूजनाच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा ही दास्तान मंदिरात ठेवली जातात. हे सर्व ग्रामस्थ उपस्थित राहून करतात. रात्री देवी समोर भजन, फुगड्या खेळून देवीचा जागर केला जातो.





**माणगाव : शहर राष्ट्रवादी काँग्रेस आयोजित गौरी गणपती सजावट स्पर्धेत प्रथम आलेले नगरपंचायत हद्दीतील उतेखोल गावचे रवींद्र मढवी व द्वितीय राहुल लावंड यांना बक्षीस देऊन सन्मानित करताना माजी नगरसेवक जयंत बोडेरे. सोबत माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ, युवानेते सुमित काळे, साहिल गायकवाड, सौरभ खैरे, चेतन गवाणकर आदी दिसत आहेत.** (छाया : सलीम शेख)

# भारताची विजयी आघाडी

## ■ ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेतील तिसरा वनडे सामना उद्या

**इंदूर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने रविवारी दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ९९ धावांनी ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला. याचबरोबर तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशा फरकाने विजयी आघाडी घेतली. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीस आलेल्या भारतीय संघाने पाच गडी गमावून ३९९ धावा केल्या होत्या. पावसाचा अडथळा आल्यामुळे ऑस्ट्रेलियाला डकवर्थ लुईस नियमानुसार ३३ षटकांत ३१७ धावांचे लक्ष्य मिळाले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ २८.२ षटकांत २१७ धावांमध्ये गारद झाला. या मालिकेतील तिसरा व अखेरचा सामना बुधवारी (दि. २७) राजकोटमध्ये खेळला जाणार आहे.

मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाकडून शॉन बॉटने ५४ आणि डेव्हिड वॉर्नरने ५३ धावा केल्या. बाकीचे खेळाडू विशेष काही करू शकले नाही कर्णधार स्टीव्ह स्मिथ खातेही उघडू शकला नाही. भारताकडून रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजाने शानदार गोलंदाजी केली. दोघांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. प्रसिद्ध कृष्णाला दोन आणि मोहम्मद शमीला एक विकेट मिळाली.





तत्पूर्वी ऑस्ट्रेलियन कर्णधार स्टीव्ह स्मिथने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. फलंदाजी करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाच्या शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर यांनी स्मिथचा निर्णय चुकीचा ठरवला. या दोघांनीही शतके झळकावली. त्याचबरोबर केएल राहुल आणि सूर्यकुमार यादव जोरदार फटकेबाजी करीत अर्धशतके साकारल्याने भारतीय संघाने ऑस्ट्रेलियासमोर ४०० धावांचे लक्ष्य ठेवले.

भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरने ८६ चेंडूंत शतक झळकावले. हे त्याचे एकदिवसीय कारकिर्दीतील तिसरे आणि एकूण चौथे शतक होते. शतकानंतर तो १०५ धावा काढून बाद झाला. त्याने ९० चेंडूत ११ चौकार आणि तीन षटकार लगावले. या खेळीसाठी त्याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. श्रेयसने शुबमन गिलसोबत दुसऱ्या विकेटसाठी २००धावांची भागीदारी केली. शुबमननेही एकदिवसीय कारकिर्दीतील सहावे आणि एकूण नववे शतक ९२ चेंडूंत झळकावले. त्याने ९७ चेंडूंत १०४ धावांचे योगदान दिले.

कर्णधार केएल राहुलने ३८चेंडूत ५२ धावांची खेळी केली. त्याचवेळी इंदूरमध्ये अखेर सूर्यकुमार यादवचे वादळ पाहायला मिळाले. त्याने ३७ चेंडूंत सहा चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने नाबाद ७२ धावांची खेळी केली. त्याचबरोबर रवींद्र जडेजा १३ धावा करून नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाकडून कॅमेरून ग्रीनने दोन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर जोश हेझलवूड, शॉन बॉट आणि अ‍ॅडम झाम्पा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

मालिकेतील विजयासोबतच भारताने यंदाच्या वनडे मालिकेत ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या पराभवाचा बदलाही घेतला. कांगारू संघाने मार्चमध्ये तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत भारताचा २-१असा पराभव केला होता.

# वाडगावच्या कुस्ती स्पर्धेत नाथा पवार विजेता

## ■ यजमान आखाड्याचे वर्चस्व

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानिमित्त अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे हनुमान तालीम संघ व ग्रामस्थ यांच्या विद्यमाने कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सांगली बेनापूर येथील पैलवान नाथा पवार यांनी प्रथम क्रमांकाची कुस्ती जिंकली, तर यजमान आखाड्याने वर्चस्व राखले.

मानाची कुस्ती नाथा पवार आणि सागर सुळ सातारा तालीम या दोन पैलवानांमध्ये झाली. यामध्ये पवार यांनी बाजी मारली व प्रथम क्रमांकाचे रोख ५० हजार रुपये बक्षिसाचा मानकरी ठरला. द्वितीय क्रमांकाची कुस्ती पैलवान सत्तपाल शिंदे बेनापूर तालीम विरुद्ध पैलवान विशाल राजगे सातारा तालीम यांच्यात रंगली. यामध्ये राजगे यांनी व्दितीय क्रमांकाचे रोख २५ हजार रुपये बक्षीस पटकाविले. तृतीय क्रमांकाची कुस्ती पैलवान प्रतिक भंडारी चौधरपाडा तालीम विरुद्ध पैलवान अक्षय ठोंबरे सातारा तालीम यांच्यात झाली. यात ठोंबरे यांनी विजय मिळवत १० हजार रुपये बक्षीस जिंकले. चतुर्थ कुस्ती राम धायुगडे यांनी जिंकली.



या कुस्ती स्पर्धेत एकूण ११ आखाड्यांनी सहभाग घेतला होता, तर अंदाजे २५० कुस्त्या झाल्या. यात यजमान वाडगाव आखाड्याचे वर्चस्व राहिले, परंतु यजमान म्हणून त्यांनी बक्षिसाचा मान स्वीकारला नाही. त्यामुळे आंदोशी शिवाजी व्यायामशाळा आखाड्यास प्रथम क्रमांक देण्यात आला. टाकादेवी स्पोर्ट्स मांडवा संघ द्वितीय आणि जय हनुमान पनवेल आखाडा तृतीय क्रमांकावर राहिला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात आले.

स्पर्धेत प्रमोद भगत, कुलदीप पाटील, वैभव मुकादम, अंकुर घरत, सुधाकर पाटील, प्रकाश भगत, संदीप मोरे, नरेंद्र भोपी, उमेश पेटे यांनी पंचांचे काम पाहिले. स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी उपस्थिती होते.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा नुकतीच नवीन पनवेल येथील सिडको समाज मंदिरात झाली. शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांनी या दोन दिवसीय स्पर्धेचे नियोजन केले होते.

स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे सहाय्यक डिस्ट्रीक्ट गव्हर्नर परमेश्वरन व पनवेल अध्यक्ष एस. जी. चव्हाण यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण डिस्ट्रीक्ट गव्हर्नर ए. के. शर्मा व चव्हाण तसेच मीना पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभास लायन्स क्लब ऑफ पनवेलचे सेक्रेटरी अशोक गिल्डा, प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, अलका चव्हाण, नंदकिशोर धोत्रे, मधुकर भगत, मदन गोवारी, संजय गोडसे, हेमंत ठाकूर, गौतम म्हस्के, माजी अध्यक्ष भावना जेसवानी, शोभा गिल्डा तसेच लायन लेडिज, लायन सभासद आणि लिओ क्लब ऑफ पनवेलचे सभासद उपस्थित होते.

या स्पर्धेत २३० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे आदिवासी, कातकरी समाजाची मुले तसेच झोपडपट्टी विभागातील मुला-मुलींचाही सहभाग होता. चीफ रेफ्री म्हणून डी. आर. साळसकर व असिस्टंट चीफ रेफ्री म्हणून शामल डेब्बार्मा यांनी काम पाहिले.





या वेळी जीएसटी विभागाचे सहाय्यक कमिशनर आणि आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक जगदीप भिवंडकर यांचा सत्कार करण्यात आला. कै. मोरेश्वर पोतदार व कै. मंगला पोतदार यांच्या स्मरणार्थ लायन्स क्लब ऑफ पनवेलचे माजी अध्यक्ष संजय पोतदार यांच्यातर्फे टेबल टेनिस स्पर्धेतील पुरुष व महिला विजेत्यास फिरता चषक देण्यात आला.

**गटनिहाय निकाल (विजेते, उपविजेते)**

नवोदित : मुली-श्रेया अशोक जानकर, पृथा श्रीकांत मोहिते, मुले-यश थाटे, अक्षय वर्मा; ११ वर्षाखालील : मुली-त्रिशा शेखर पावशे, श्रेया अशोक जानकर, मुले-कार्तिक जितेंद्र ठाकरे, आदित्य जोग; १३ वर्षाखालील : मुली-स्वस्ती सचिन भोईर, त्रिशा शेखर पावशे, मुले- अद्वित गुप्ता, रेयांश शाहू; १५ वर्षाखालील : मुली-वैदही जितेंद्र ठाकरे, क्रिशीका विलास धांडे, मुले-हर्षद अनिल कुदाळे; १७ वर्षाखालील : मुली-क्रिशीका विलास धांडे, वैदही जितेंद्र ठाकरे, मुले-रिशी चौहान, अनिरूद्ध राजेश; १९ वर्षाखालील : मुली-अनिशा पात्रा, वैदही जितेंद्र ठाकरे, मुले-विवेक पाल, रिशी चौहान; पुरुष एकेरी-रिषब साळसकर, निकलस दास; ज्येष्ठ पुरुष-निकलस दास, डॉ. विलास धांडे; पुरुष दुहेरी सनित पाटील व विवेक पाल, निकलस दास व लोकेश पटवा.

# खोपोलीच्या क्षितिजा मरागजेला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत 'सुवर्ण'





**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली येथील क्षितिजा जगदिश मरागजे हिने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक पटकाविले. तिचे परिसरात कौतुक होत आहे.

क्षितिजाने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना मुंबई विभागात सुवर्णपदक प्राप्त करून शालेय राज्य स्पर्धेत सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय स्पर्धा लातूर येथे झाली. यामध्ये तिने सुवर्णपदक जिंकून खोपोलीचे पर्यायाने रायगड जिल्ह्याचे नाव उंचावले. याच स्पर्धेत प्रणिती शिंदे हिने कांस्यपदक मिळविले.

स्व. भाऊ कुंभार कुस्ती संकुलात कुस्ती विशेषज्ञ संदीप वांजळे, कुस्ती प्रशिक्षक राजाराम कुंभार, बाळा दादा, दिवेश पालांडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षितिजा सराव करते. यशाबद्दल तिचे अभिनंदन होत आहे. आता प्रतीक्षा राष्ट्रीय सुवर्णपदकाची, अशी समर्पक प्रतिक्रिया खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी व्यक्त केली आहे.

# भारतीय संघाचा षटकारांचा विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंदूरमध्ये रविवारी झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने इतिहास रचला. या सामन्यात भारतीय फलंदाजांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध तडाखेबंद फलंदाजी करीत ५० षटकांत पाच गडी गमावून ३९९ धावा केल्या, ज्यामध्ये ३१ चौकार आणि १८ षटकारांचा समावेश होता. या १८ षटकारांच्या आधारे भारत वनडे फॉरमॅटमध्ये तीन षटकार पूर्ण करणारा पहिला संघ बनला आहे. याआधी वनडेमध्ये कोणत्याही संघाने इतके षटकार मारलेले नाहीत.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताकडून ७२ धावांची नाबाद खेळी करणारा फलंदाज सूर्यकुमार यादवने आपल्या डावात सर्वाधिक सहा षटकार ठोकले. या खालोखाल शुबमन गिलने १०४ धावांच्या खेळीत चार षटकार, श्रेयस अय्यरने १०५ धावांच्या खेळीत तीन षटकार, तर कर्णधार केएल राहुलने ५२ धावांच्या खेळीत तीन षटकार ठोकले. इशान किशननेही वेगवान खेळी करून १८ चेंडूंत ३१ धावा केल्या आणि या दरम्यान दोन षटकार ठोकले.

इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने १८ षटकार ठोकले. याआधी २०१३मध्ये भारताने बंगळुरूमध्ये याच संघाविरुद्ध १९ षटकार ठोकले होते. २०२३ साली इंदूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध १९ षटकारही ठोकले होते.

# शुबमन-श्रेयसने मोडला सचिन-लक्ष्मणचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

इंदूर येथील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय फलंदाजांनी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांचा जोरदार समाचार घेत विजय साकारला. शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर यांच्या शतकी खेळीसह कर्णधार केएल राहुल आणि सूर्यकुमार यादव यांच्या झटपट अर्धशतकांनीही भारतीय संघाला ३९९ ही धावसंख्या गाठण्यात मोठी भूमिका बजावली.

या सामन्यात शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर यांनी टीम इंडियाला मजबूत आधार दिला. दोघांमध्ये दुसऱ्या विकेटसाठी १६५ चेंडूंत २०० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली. या भागीदारीच्या जोरावर या दोन्ही फलंदाजांनी इंदूरमध्ये सचिन तेंडुलकर आणि व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी बनवलेला २२ वर्षे जुना विक्रम मोडला.



या सामन्यात शुबमनने १०४ धावा केल्या, तर श्रेयस ने १०५ धावांची शतकी खेळी केली. या दोघांमध्ये दुसऱ्या विकेटसाठी द्विशतकी धावांची भागीदारी झाली. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात भारताची ही सर्वांत मोठी भागीदारी ठरली. यापूर्वी हा विक्रम सचिन आणि लक्ष्मणच्या नावावर होता. या दोघांनी २००१ साली इंदूरमध्ये कांगारू संघाविरुद्ध १९९ धावांची भागीदारी केली होती.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसऱ्या विकेटसाठी २०० धावांची भागीदारी करणारी ही तिसरी यशस्वी जोडी आहे. शिखर धवन आणि विराट कोहली यांनी २०१६मध्ये सर्वाधिक २१२ धावा केल्या होत्या, तर कोहलीने रोहित शर्मासह पर्थमध्ये दुसऱ्या विकेटसाठी २०७ धावा केल्या होत्या.

# वाडगावमध्ये रंगला वाळूवरच्या कुस्तीचा फड

## राज्यभरातील ४०० मल्लांचा सहभाग



**अलिबाग : प्रतिनिधी**

कुस्ती म्हटले की, डोळ्यासमोर येतो पश्चिम महाराष्ट्रातील लाल मातीचा फड. आता तिची जागा मॅटनेही घेतली आहे, परंतु अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे वाळूवरील कुस्त्यांचा फड रंगला. सांगली जिल्ह्यातील बेणापुर तालमीचा आंतरराष्ट्रीय पैलवान नाथा पवार याने मानाची कुस्ती जिंकत गदा पटकावली, तर आंदोशीच्या शिवाजी व्यायामशाळेने सांघिक विजेतेपद पटकावले.

गणेशोत्सवानिमित्त वाडगाव येथील हनुमान तालीम संघ आणि वाडगाव ग्रामस्थांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. कोकणातील ही वाळूवरची कुस्ती अनुभवण्यासाठी पुणे, सातारा, सांगली,

> **५० ते ६० वर्षांची परंपरा असलेल्या या स्पर्धेला आजवर राज्यातील अनेक नामवंत मल्लांनी हजेरी लावली आहे. कोकणातील नवीन पिढीमध्ये कुस्ती खेळाविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने या स्पर्धा आयोजित केल्या जातात.**
>
> **-जयेंद्र भगत, अध्यक्ष**
>
> **अलिबाग तालुका कुस्तीगीर संघ**

कोल्हापूर, पुणे, मुंबई, ठाणे येथील ४००हून अधिक मल्ल स्पर्धेत सहभागी झाले होते. आठ वर्षांच्या चिमुरड्यापासून २५ वर्षापर्यंतच्या तरुणांपर्यंत विविध वजनी आणि वयोगटातील कुस्त्या या आखाड्यात रंगल्या. या स्पर्धा पाहण्यासाठी कुस्तीप्रेमींनी गर्दी केली होती.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, हनुमान तालीम संघाचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकूर, उपाध्यक्ष गोपीनाथ ठाकूर, इतर सदस्य व वाडगाव ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

# जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत माणगावची ध्रुवी खाडे अव्वल

## विभागीय स्पर्धेसाठी निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणेद्वारा आयोजित रायगड जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा पनवेल येथे नुकतीच घेण्यात आली. या स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात माणगाव मुगवली येथील लीड स्कूल या शाळेची विद्यार्थिनी ध्रुवी राजेंद्र खाडे हिने ५० मीटर बटरफ्लाय या जलतरण प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले. त्यामुळे तिची विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. ध्रुवी खाडे हिने ५० मीटर फ्री स्टाईल या प्रकारातही तृतीय क्रमांक पटकावून शाळेसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. यासाठी तिला शाळेचे प्रशिक्षक शिक्षक मंदार चौलकर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील जलतरण प्रशिक्षक दत्ता तरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर साई मँगो रिसोर्टचे मालक मंगेश निंबाळकर यांचे सहकार्य लाभले. सतत मुलांना जलतरण खेळाविषयी प्रोत्साहन देणारे सेवानिवृत्त तहसीलदार रावसाहेब निंबाळकर यांनीही तिला मार्गदर्शन केले.



या यशाचे कौतुक नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, लीड स्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, जलतरण मार्गदर्शक दत्ता तरे, पालक राजेंद्र खाडे यांनी केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com